# दोनुली



म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 2840

REFBK-0022811
REFBK-0022811

वा. रा. कान्त

वगास
२४७०
दोनुली २२८७७
१५।१२।७९
संदर्भ शाखा

# दोनुली

वा० रा० कांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. प.)

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : २७१

पहिली आवृत्ती : ऑक्टोबर १९७९

© १९७९, मुकुंद वामन कांत

मुखपृष्ठ : पद्मा सहस्त्रबुद्धे

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत : साडेबारा रुपये

माझ्या
दिवंगत
पत्नीस

# अनुक्रम


देठाचं मनोगत एक

रान १
पाणी २
वारा ३
ऊन ४
तळे ५
चांदणे ६
कमळ ७
अंधार ८
तारा ९
समुद्र १०
औरंगाबाद १२
दुपार १४
शब्द १५
अस्तित्व १६
आरामखुर्ची १७
रस्ते १९
दाणे २१
वार्ता २२
वादु तो मी–गोविंदु २३
मच्छीकमान २४
अमलताश २६
हे दुःखप्रिया २८
म्हणजे–म्हणजे २९
स्तन ३०
पुत्र ३२
कवीचे झाड ३४
खुल्दाबाद रोज़ा ३६

परिशिष्ट ३८

# देठाचं मनोगत

'दोनुली' हे या काव्यसंग्रहाचं नुसतं नाव नाही. त्यापेक्षा काही अधिक आहे.

वेगळ्या ठाणमाणाच्या पंचवीससव्वीस कविता यात संग्रहित केल्या आहेत. ते 'ठाणमाण', भावानुभूतीचं ते भान या शब्दातून सूचित व्हावं. या कवितांचं स्वरूप द्विदलात्मक आहे असं मला प्रथम वाटलं होतं. पण त्या शब्दानं या काव्याचं यथार्थ आणि संपूर्ण रूपांकन होत नाही, असं नंतर लक्षात आलं. खरं म्हटलं तर ते रूप उगवत्या रोपासारखं आहे. खाली एकाच देठानं जुळलेलं, परंतु दोन दिशांनी झेपावणाऱ्या आपल्या दळदारपणानं त्या रोपाला एक वेगळा आकार देणारं, त्याच्या अस्तित्वाला जपणारं. रोपाच्या अस्तित्वाचं हे भान अन् दळांचं 'दोघुलेपण', जे या कवितेत व्यक्त होतं, त्याची कल्पना देण्यासाठी 'दोनुली' हा शब्द योजला आहे. दळं दोन असली रोपाला, तरी देठ एकच असतं. त्या देठाचं हे मनोगत.

अर्थात शब्द इथं महत्त्वाचा नाही. त्या शब्दातून सुचविला जाणारा अस्तित्वधर्म महत्त्वाचा आहे. असं असलं, तरी शब्दालाही त्याचं एक स्थान असतं. तो अर्थाचं वहन करतो, तशीच त्याची जडणघडणही करतो. संकेतानं, सवयीनं आणि व्यावहारिक वापरानं नादाच्या एका विशिष्ट संघटनेला जेव्हा विशिष्ट अर्थ प्राप्त होतो, तेव्हा त्याचा शब्द होतो. या शब्दाभोवती जसं एक अर्थवलय असतं, तसं एक नादवलयही असतं. नादाच्या व अर्थाच्या या दोन वलयांच्या संयोगातून अर्थाचा बोध निश्चित होतो. अनेकदा त्याच्यामुळं शब्दाच्या मूलार्थाच्या कक्षाही रुंदावतात, बदलतात. नादातही अनुभूतीचं एक रूप असतं. म्हणूनच महाकवी आणि तत्त्वज्ञ ज्ञानदेव उद्गारतात, 'आम्ही नादासी रूप देखिलें'.

मी काही भाषाशास्त्रज्ञ नाही. तेव्हा शास्त्रपूत असं काही मला सांगता येणार नाही. परंतु कवितेच्या निमित्तानं शब्दांचं चालणं-डोलणं जवळून पाहिलं आहे. तेवढंच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सान-सानुली, सोन-सोनुली असे शब्द आपण बनवतो. त्याप्रमाणेच हा दोन-दोनुली. 'सान' शब्दाचा मूळ अर्थ लहान एवढाच होतो. पण त्याला 'ली' हा प्रत्यय लागताच, त्यातून लघुत्वदर्शक अथवा लाडिकपणाच्या, जवळकीच्या भावाचाही बोध होतो, असं मला वाटतं. कारण शब्द वापरणाऱ्या मनाचा भावही त्यात प्रतिबिंबित झालेला असतो. 'सोनुली' या शब्दानं सोनेरी वर्ण सूचित होतो. शिवाय, त्याबरोबरच त्या शब्दातून चाफेगौरपणाचा, रंगसौंदर्याचा जो एक अनुभव मनाला जाणवलेला असतो, तोही त्या आवडत्या संबोधनातून व्यक्त झालेला असतो. तसंच तो शब्द प्रेमानं उच्चारणाऱ्या मनाची निर्भर स्थितीही त्यात ध्वनित होते. विशेषतः त्या शब्दाचा पुनःपुन्हा उच्चार करताना नादाची जी लयबद्ध आंदोलनं होतात, त्यांतून या शब्दाच्या अर्थकक्षा आणि भावाची सांद्रता वाढायला साहाय्य होतं. नादाच्या या शक्तीचा काव्यात अधिक उपयोग निरनिराळ्या प्रकारे करून घेण्यात

येतो, हे तर सर्वांनाच माहीत आहे. एक पाश्चात्त्य चित्रकार तर म्हणतो की रंगालाही नाद असतात. चित्रकाराला ते कुंचल्यातून रंगरूपात व्यक्त करायचे असतात.

'दोनुली' या शब्दाचंही असंच आहे.[1] दोन हा मुळात संख्यावाचक शब्द. पण मौज अशी, की त्याला 'ली' हा प्रत्यय लागताच संख्येचं गुणात रूपांतर होतं. संख्या स्व-अतीत (transcend) होऊन गुणात, सौंदर्याच्या आणि सर्जनाच्या अनुभूतीत प्रवेश करते. ज्ञानेश्वरांनी अशा शब्दांचे प्रयोग विपुलतेने केले आहेत : दोघुले, दोघुलेपण, दादुलेपण, मीपण, दंपत्यपण इत्यादी. इथं ही गोष्ट मान्य करायला पाहिजे की ही चर्चा भाषाशास्त्रापेक्षा मानसशास्त्रीय व वाङ्मयीन अधिक झाली. एका दृष्टीनं हेही बरोबरच म्हटलं पाहिजे. मानसातलं उचंबळणं जेव्हा शब्दांच्या पात्रामधून दुथडी खळाळत येतं, तेव्हाच त्याची काव्यवाहिनी होते.

शब्दाचा असा मनमोकळा विचार चालू असतानाच, 'दोनुली'संबंधानं काही रसिक मित्रांच्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या. एका मित्रानं असा प्रश्न केला, की दोन तपांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या तुमच्या 'शततारका' या संग्रहातील रुबायां(कणिका)-सारखाच हा प्रकार नाही का? तर दुसऱ्या काही मित्रांनी असं विचारलं, की या कवितांना काही वेगळा रूपबंध आहे, असं तुम्हांला वाटतं का? पहिल्या प्रश्नातला गर्भितार्थ मला मान्य नाही. 'शततारकां'च्या पुढं बरीच वाट चालून आलो आहे मी. शिवाय, रुबायांचा तो प्रकार आहे सूक्तीसारखा—सुऱ्या, त्रुटित कल्पना-विचारांसारखा, ठिणग्यांप्रमाणे तडतडत अंधारात विरणारा. त्या त्रुटित अनुभव-कल्पनाकणांना भावस्थितीचं (mood) रसपूर्ण, अनुभवसंपन्न स्वरूप आलेलं नसतं. ते रूप येण्यापूर्वीच त्यांच्या अभिव्यक्तीची धाव (range) संपलेली असते. एखाद्या जीवनानुभवाचा सखोल, उत्कट आविष्कार तिथं अभिप्रेत नसतो.

१. हा शब्द मनात घोळत असताना एकदा तर मला आमच्या घरातल्या 'दोनाळी' बंदुकीची आठवण झाली. मनाचे व्यापार मोठे विचित्र, विसंगत असतात. त्यांत उदात्त व क्षुद्र, अपेक्षित व अनपेक्षित, आणि हवंसं व नकोसं यांचं अनाकलनीय मिश्रण असतं. माझे वडील पोलीस-अधिकारी होते. त्यामुळं त्यांच्याकडे बंदूक असणं जितकं स्वाभाविक, तितकं त्याची आठवण मला होणं हेही स्वाभाविक. पुढं, पडत्या काळात, ती बंदूक विकण्याची पाळी वडिलांवर आली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. हाडामांसाचा माणूस घरातून गेल्याइतकं त्यांना वाईट वाटलं. ती घटना माझ्या मनात खोल रुतून बसली. उर्दू भाषेत 'दोनाळी' बंदुकीला 'दोज़रबी' (द्वयाघाती) म्हणतात. दोन नळ्यांतून दोन वेगवेगळ्या गोळ्या सुटतात; पण त्यांचं लक्ष्य एकच असतं. अनुभवलक्ष्याची ही एकता, तिची आवड मनात नकळत लहानपणापासून दडून बसली असावी. तिनं या आविष्कारा-राला काही प्रमाणात प्रेरणा दिली असावी. या मानसिकतेतही या आविष्काराचं बीज असेल कदाचित.

रूपबंधासंबंधीच्या प्रश्नाचं उत्तर देण्यात मला फारसा रस नाही. काव्याच्या रूपबंधासंबंधीची ही चर्चा अनेकदा भ्रामक ठरते. आपल्या काव्यशास्त्राच्या परंपरेत पुष्कळदा बाह्य रूपबंधाशीच तो विचार जास्त निगडित झाल्यासारखा वाटतो. याचा थोडासा विचार पुढं येईल. इथं इतकंच सुचवून ठेवतो, की कवितेला एक आंतरिक रूपबंधही असतो; आणि ही आंतरिक संघटना फार महत्त्वाची आहे. तिच्या आकलनाला केवळ, कोरडा बाह्य रूपबंधाचा विचार अपुरा पडतो. इतकंच नव्हे तर काही वेळा काव्याच्या अंतरंगाकडे जाण्यासाठी स्वीकारलेली ही वाट तिची मर्यादा ठरते. तिच्यामुळं शोधाची वाटच बुजून जाण्याची शक्यता निर्माण होते. रूपबंधाचा संबंध मुख्यतः आंतरिक संघटनेशी असतो, असावा. ही संघटना 'मनसिज' आहे, सर्जक आहे. तीच रूपबंधाला आकार देते.

बाह्य रूपबंधातच रसिकांची दृष्टी नकळत कशी गुंतू पाहते, हे दर्शविण्यासाठी या प्रतिक्रियांचा मी उल्लेख केला. आजचे काही समीक्षक या आंतरिक रूपबंधाचा विचार करू लागले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. समीक्षकांची दृष्टी बहुधा विश्लेषणात्मक असते. परंतु त्याबरोबर हेदेखील मान्य करायला पाहिजे, की सत्याचा, सौंदर्याचा शोध अनेक अंगांनी, अनेक स्तरांतून आणि माध्यमांतून घेण्याची गरज आहे. आत्मशोधन, आत्मनिवेदन हीदेखील सत्याकडे पाहण्याची एक दृष्टी आहे. समीक्षक कलाकृतीकडे टीकेच्या, भाष्याच्या दृष्टीनं पाहतो, तर कवी तिच्याकडे अनुभव जोगवण्याच्या दृष्टीनं, पोसण्याच्या दृष्टीनं बघतो.

'तो संकल्पु लावी दिवा। वाचेचा गा' असं ज्ञानेश्वरांनी एके ठिकाणी, मन आणि क्रिया यांच्या संदर्भात, म्हटलं आहे. कवीचा संकल्प, कल्पना ही वाणीचा दिवा अशाच प्रकारे उजळते. शब्दामागे कवीचं कल्पनीयही (idea) उभं असतं. त्याचा शोध घेणं कलावंताच्या कार्याचा एक भाग आहे. कारण ती प्रक्रिया त्यानं अधिक जवळून पाहिलेली असते. ज्ञानेश्वरांसारख्या महान प्रतिभावंतानं ती पाहिली आहे. त्याला ते 'कुलालमतीचे गर्भ' म्हणतात. मी 'दोनुली'च्या निर्मितिप्रक्रियेकडे अशाच दृष्टीनं पाहतो. कवितेच्या निर्मितीपूर्वी, निर्मिती होत असताना आणि निर्मितीनंतर मला काय वाटत होतं, या प्रत्येक अवस्थेत मनाची कशी कशी आंदोलनं होत होती, हे सांगण्याचा मी यत्न करणार आहे. अर्थात हे असंच घडलं, घडतं असं मला म्हणायचं नाही. आठवेल तितकं, जमेल तसं आणि मला जाणवलं त्याप्रमाणं हे निवेदन करणार आहे. त्यावरून तुम्ही काय ती अनुमानं बांधावीत. ती बांधायला तुम्ही स्वतंत्र आहात. मी मात्र माझ्या कवितेला बांधलेला आहे. ती बोलते तेवढंच मी सांगेन. त्यातही कवितेप्रमाणं निवेदनाच्या काही पायऱ्या सुटलेल्या असतील. वाचकांनी लक्षात घ्यावं की निर्मितिप्रक्रियेचं हे एक धूसर स्मरणचित्र आहे. त्यापलीकडेही काही अदृश्य, अगम्य असेल, असतं; पण ते सांगायला माझ्याजवळ शब्द नाहीत. म्हणजे त्यात काही गूढ, अज्ञेय आहे, असं मला म्हणायचं नाही. मनाच्या वेगाबरोबर माणसाला धावता येत नाही, त्याच्या तळघरात

खोलखोल उतरता येत नाही, इतकंच.

कविता लिहिताना मनात एक अस्फुट आनंद फुलत असतो. तसाच आनंद आपल्या पूर्ण केलेल्या कलाकृतीकडे वळून पाहताना कलावंताला व्हावा. हाही एक सर्जनाचाच आनंद असतो; आणि पहिल्या आनंदापेक्षा काहीसा सुजाण. पण त्यात आत्मतुष्टी नसावी, अतृप्ती असावी. असमाधान शिलगत असावं. तरच ते कलावंताचं खरं मागं वळून पाहणं, सिंहावलोकन. या दोन्ही अवस्थांत येणारी आनंदाची प्रतीती हीच कलावंताच्या दृष्टीनं महत्त्वाची, असं मला वाटतं. त्यातून काही शोधलं गेलं, काही गवसलं, तर उत्तमच. एरव्ही हा आनंदही काही कमी नाही. या दृष्टीनं या निवेदनाकडे पाहावं.

बारा वर्षांपूर्वी मी या कविता लिहायला सुरुवात केली. बारा वर्षांत फक्त पंचवीस-सव्वीस कविता लिहून झाल्या. रचनाकालाच्या दीर्घतेचा हा उल्लेख वडिलकीचा दाखला काढण्याच्या उद्देशानं केलेला नाही. 'फुलाचं वय विचारायचं नसतं' या गडकऱ्यांच्या वाक्यावर माझं मन पोसलेलं आहे. या संग्रहातली पहिली कविता ३० ऑगस्ट १९६६ या दिवशी लिहिली आणि सव्विसावी कविता २७ डिसेंबर १९७८ या दिवशी. परंतु या कवितेचं काही वेगळं 'आपलेपण' आहे, 'स्व-त्व' आहे, हे बरेच दिवस माझ्या लक्षात आलं नाही. ता० २१-१-६७ ला 'वारा' ही कविता अलिबागला जाताना लिहिली. प्रवासात माझे मित्र प्रा० डॉ० व० दि० कुलकर्णी आणि प्रा० गंगाधर पाटील यांना ती वाचून दाखवली. दोघांनाही ती आवडली. पण माझं समाधान झालं नव्हतं. वाऱ्याचा मला भावलेला अनुभव पूर्णपणे त्यात अवतरला नव्हता. सुंदरीचं रूपलावण्य एकाच बाजूनं पाहिल्यासारखी मनाला चुटपूट लागून राहिली होती. त्या अनुभवाचं दुसरं रूप माझ्या मनाच्या तळघरात अडकलं होतं. तिथून मुक्त करून त्याला शब्दांत वसवायचं होतं. मी त्यांना एवढंच म्हणालो, "वाऱ्याचा काहीएक अनुभव इथं व्यक्त झाला आहे. त्याचं दुसरं, समग्र रूप अजून रेखाटायचं आहे. त्याखेरीज ही कविता पूर्ण होणार नाही." यावर कुणी काही बोललं नाही. अनुभवाचा तो दुसरा तुकडा मांसात रुतलेल्या भागासारखा मनात खुपत होता. मुंबईला परत आल्यावर, दोनतीन दिवसांत, वाऱ्याची दुसरी कविता पूर्ण झाली. ते खुपणं संपलं. अंतःकरणात समाधानाचे, तृप्तीचे थेंब ठिबकले. दोन्ही कविता मिळून वाचताना असं जाणवलं, की या दोन कविता वेगळ्या असल्या, आणि वेगवेगळ्या वेळी रचल्या गेल्या असल्या, तरी त्यांच्यातला अनुभवबंध एकच आहे. पाहून चकित झालो. दोन्ही कविता द्विदलासारख्या एकाच देठाशी गुंतल्या होत्या, अनुभव-केंद्राच्या एकाच गाठीशी बांधल्या होत्या. त्या दोन असल्या तरी परस्परोपजीवी होत्या. त्यांच्या दळदार आकारानं, आधारानं एक अनुभवाचं रोप लसलसत होतं. त्यातून आकारणाऱ्या जीवनानुभूतीचं आणि त्यातून निर्माण होणाऱ्या भावस्थितीचं (mood) रूप एकच होतं. त्या दोन कविता वेगळ्या केल्या, तर त्यांच्या सलगतेला, एकात्मतेला ढका लागेल. माझी ही प्रतिक्रिया मी कुठं व्यक्त

केली नाही, तरी मनाशी अशी खूणगाठ बांधली, की अनुभव ग्रहण करण्याची व त्याचा आविष्कार करण्याची ही प्रक्रिया काहीशी निराळी आहे. असे अनुभव, अशा स्वरूपात जेव्हा येतील तेव्हा त्यांना जपलं पाहिजे, जोगवलं पाहिजे. मात्र या कवितांचं 'दोनुली' हे नामकरण फार उशिरा झालं. संग्रहरूपानं या कविता एकत्र प्रकाशित कराव्या, असा विचार जेव्हा मनात घोळू लागला, तेव्हा एके दिवशी हे नाव सुचलं.

या बारा वर्षांतल्या माझ्या काव्यरचनेचा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा मनाला त्याचं मोठं कुतूहल वाटतं. या काळात विविध स्वरूपाची कविता मी लिहिली, भावकविता (lyrics) लिहिली. गीतं लिहिली. दीर्घकाव्यांचं, खंडकाव्यांचं लेखन केलं. नाट्यकाव्यांची रचना केली. इतक्या विविध प्रकारचं काव्यलेखन करूनही माझं मन आत्माविष्काराच्या बाबतीत असमाधानीच राहिलं, भुकंच राहिलं. उर्दूचा महाकवी गालिब यानं कलावंताच्या या सर्जक मनोवस्थेचं मोठं समर्पक वर्णन केलं आहे :

बक़दर-ए-शौक़ नहीं जर्फ़-ए-तनगुना-ए-ग़ज़ल
कुछ और वसअत् चाहिए मेरे बयाँके लिए

"ग़ज़लची ही लय माझ्या जीवनोत्सुकतेला अपुरी वाटते. अजून थोडा अवकाश हवा आहे माझ्या आविष्कारासाठी." इथं एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ग़ालिबनं ग़ज़लऐवजी दुसऱ्या रूपबंधाची (Form) मागणी केली नाही; केवळ अवकाश मागितला. माझ्याही आविष्काराच्या उड्डाणाला थोडं अस्मान हवं आहे. कशाचा आकार असतो त्या अस्मानाला, अवकाशाला?

असं शब्दांच्या अवतीभोवती फिरण्यापेक्षा, 'दोनुली'तल्या काही कविता घेऊन या प्रश्नाचा विचार केला तर—

—तर हा संग्रह चाळताना, कवितांच्या मथळ्यांवर नजर पडताच, स्थूल मानानं प्रथम आपल्याला असं दिसून येतं, की पंचवीस-सव्वीस कवितांपैकी बारातेरा म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक कविता निसर्गपर आहेत : रान, ऊन, वारा, तळं, कमळ, अंधार, समुद्र इत्यादी. म्हणजे या कवितांत निसर्गाला महत्त्वाचं स्थान आहे असं वाटतं. निसर्गदृश्यांतून या कविता स्फुरतात हे खरं, पण त्यांत निसर्ग नसतो. त्यांत पानाफुलांचं सुगंधी सळसळणं नाही, की झऱ्याचं शीतळ अवखळ झुळझुळणं नाही; त्यांत पाकळ्यांकडून सुगंधाकडे जाणाऱ्या मनाची गती आहे. दोनतीन कविता ऐतिहासिक स्थळांविषयीच्या आहेत; पण त्यात इतिहास नाही. स्थळांचं वर्णनही नाही. आतापर्यंत उल्लेखिलेल्या कवितांचे विषय प्रत्यक्ष, समूर्त होते. परंतु इतर सहा कवितांचे विषय अमूर्त आहेत : जसे शब्द, अस्तित्व, वार्ता, वाद, दुःख, प्रेम इत्यादी. हे विषयही नुसती निमित्ते. म्हणजे ते विषय तिथं नसतात. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचं, तर केवळ 'बोलांचीं वालिफं'. अनेक आशय-अनुभवांचे अंकुर ते 'तूस'

फोडून अत्रू पाहतात. पानं कोंभू बघतात. तीन कवितांचा चेहरा कथात्मक आहे : रस्ते, स्तन, पुत्र. त्या कथाही कथा राहत नाहीत. महाभारताची कथा सांगताना त्या व्यासाच्या मनात शिरतात आणि वेगळंच राखेचं महाभारत घेऊन बाहेर पडतात. उरलेल्या दोन कवितांचे विषय जड वस्तू आहेत : आरामखुर्ची, दाणे. 'हे दुःखप्रिया' आणि 'म्हणजे–म्हणजे' या कवितांच्या बाबतीत कोणत्या विशिष्ट जीवनानुभवाला शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे हे चटकन सांगता येत नाही. अनेक प्रकारच्या फुलांचे व काव्यांचे अनुभवस्पर्श तिथे पालवू पाहत आहेत. आशय-विषयांच्या विविधतेची किंवा वैशिष्ट्याची कल्पना देण्याच्या हेतूने ही मथळ्यांची यादी दिलेली नाही. त्या फक्त पथदर्शक पाट्या आहेत; संकेतस्थानं नव्हेत. माझं हे म्हणणं पुरुरव्याच्या मिथित कथेनं अधिक स्पष्ट होईल. उर्वशीसाठी वेडा झालेला पुरूरवा तिला साद घालीत रानोमाळ फिरत असतो. त्याच्या हाताला कुठंतरी संगमनीय मणी लागतो. सभोवती वृक्षवेली असतात. तो विरही, उद्भ्रांत मनोवस्थेत वृक्षवेलींना उर्वशीबद्दल विचारीत असतो. त्यांना आलिंगनं देत असतो. मण्याच्या स्पर्शानं कुठल्यातरी वेलीतून उर्वशी प्रकट होते. त्या मण्यापेक्षा, त्या वृक्षवेलींपेक्षा ती निराळी असते. कविताही तशीच विषय-आशयापासून, रूपबंधापासून वेगळी असते—स्वतंत्र, सुंदर! तेव्हा वाचकांनी कविता वाचून आपलं मत बनवावं. त्यासंबंधी माझ्या मनात उत्सुकता अवश्य आहे.

आता एक-दोन कविता घेऊन या प्रश्नाचा आणखी थोडा मागोवा घेऊ. 'वाऱ्या'च्या कवितेचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. आधी त्यासंबंधीच थोडं अधिक बोलू. वाऱ्यावरील कवितेच्या पहिल्या कवितेत त्यातला 'मी' वाऱ्याचं वर्णन करतो. नेहमी झाडांच्या पानांवरून, त्यांच्या सळसळण्यातून वाऱ्याचं अस्तित्व जाणवतं. परंतु शिशिरात वारा झाडांत शिरतो, तेव्हा त्याच्या स्पर्शानं पानंच गळून पडतात. ते पाहून, तो 'मी' म्हणतो :

"पानांचा खोपा बांधायचा होता—
अचानक झाडच निष्पर्ण झाले"

त्या विफलतेनं प्रक्षुब्ध झालेल्या वाऱ्याचं वर्णन करून कवी शेवटी सांगतो, हा वारा नव्हे; हा आहे—

"नष्टनीड आत्मा
मोजीत रेषा पानांच्या, दैवाच्या!"

परंतु वाऱ्याचं हे वर्णन स्वतः वाऱ्याला मान्य नाही. मग तो स्वतःच आत्मकथन करू लागतो. (तृतीय पुरुषी, त्रयस्थ निवेदनाचं प्रथम पुरुषी स्वगत होतं. कारण अनुभवबंधाच्या अभिव्यक्तीची ती गरज असते.) तो म्हणतो, "वेळूच्या वनात मला सूर म्हणतात; फुलांच्या गावात मला सुवास म्हणून ओळखतात; आणि वादळी समुद्राच्या क्षितिजकाठावर, करकरा विजेचे दात खात उभा राहणारा विक्राळ कृतांतही

मीच असतो." पण क्षणभराच्या अशा अहंकारानंतर त्याचं त्यालाच वाटतं, "छे, हे काही खरं नाही." मग लीनपणानं तो सांगू लागतो :

"—अजूनही मी मला पाहिलेच नाही
बघून हजारदा डोकडोकावून,
प्रचंड आरशात युगांएवढाल्या
दिसली फक्त पिवळी पाने,
सुकलेल्या पाकळ्या
उन्हाच्या ऐन्यात."

आणि शेवटी स्वतःशीच पुटपुटल्यासारखा बोलतो :

"असेन, आहे मी,
तरीही सारखे वाटते, वाटावे,
—बरे असते ते—
सुवासाचे मरण जगणाऱ्यांसाठी."

अशा रीतीनं झाड, वारा, खोपा, वेळुवने, फुलबाग, समुद्र या साऱ्याच वस्तूंचा लय होतो; आणि त्यानंतर काय उरतं ते वाचकांच्या संवेदनेवर व अनुभूतीवर अवलंबून राहतं.

उन्हाच्या कवितेची गोष्ट यापेक्षा थोडी निराळी आहे. पावसाळ्यातल्या सकाळच्या उन्हाची ही आठवण. ऑगस्ट महिन्यातल्या त्या दिवशी स्वैपाकघरात सकाळचं ऊन पडलं होतं. तसं ते रोजच पडत होतं. परंतु त्या दिवशी सकाळी माझं लक्ष त्याच्याकडे वेधलं. शेणामातीनं सारवलेली लालसर चूल, त्या लालीतूनही फुटून दिसणारं काजळलेलं अवेलं (मुंबईत राहूनही तोपर्यंत आमच्या घरात 'बर्नर' आला नव्हता. त्याच्या अभावानंच ही कविता देणगी म्हणून दिली असं आता मला वाटतं.) खिडकीतून आलेलं कोवळं, गुलाबी, ओलसर ऊन चुलीवर पसरलं होतं. ती चूल आज अजून पेटली नव्हती. त्यावर भांडंही नव्हतं. त्यामुळं ती मला एकदम कशी ओकीबोकी, खिन्न, उदास भासली. एकाएकी मन व्याकुळ झालं. काही महिन्यांपूर्वीची चूल आठवली. तेव्हा, याच वेळी ती अलवार पेटली होती. केशरी जाळांनी फुलली होती. माझी पत्नी स्वैपाक करीत होती. अवेल्यावर दूध मंद तापत होतं. दुसरीकडे चुलीवर काहीतरी शिजत होतं. आत बारीक जाळ जपून, सावधपणानं शिलगत होता. जणू काय तिच्या धाकातच वागत होता तो! माझी पत्नी, डोक्यावरचा पदर सावरीत, त्याच्याकडे पाहून आपल्याशीच हसत होती—असं की जणू त्या जाळाचीही ती प्रेमळपणानं वास्तपुस्त करीत होती. आज ती या जगात नव्हती. त्यामुळं का ही चूल इतकी उदासवाणी दिसत होती या सकाळच्या उन्हात? दुःख गिळलेल्या ओठांवर, शांत लयीत या ओळी आल्या :

"काजळलेल्या अवेल्यावर,
शेवाळलेल्या भिंतीवर

उन्हे पडली घटकाभर
तेव्हा कळले त्यांनाही स्वप्ने असतात :"

कसली स्वप्ने ?

"उतू जाणाऱ्या दुधाची, ऊन ऊन तूपभाताची,
टोपपदरी स्मिताची,
नथेतल्या स्नेहाळ पाचूची,
मोत्यातल्या थबकल्या वादळाची,
... ... ...
पुनःपुन्हा पडणारी"

मृत्यूनं नष्ट केलेली ही घरगुती, साधीसुधी स्वप्नं माझ्या मनात जिवंत केली होती त्या घटकाभर पडलेल्या उन्हानं. त्यातून पहिल्या चार ओळी जुळल्या. परंतु 'उन्हे पडली घटकाभर' असं म्हणताना, त्या उन्हाच्या गर्भरेशमी स्वप्नांची कल्पना मला आली नव्हती. त्यांच्या काही छाया तरळत होत्या. ऑफिसची वेळ झाली होती : लगबगीनं ऑफिसात निघालो. तिथल्या कामात गढून गेलो. परंतु, दिवसभर, त्या नैमित्तिक व्यवहाराच्या पडद्यामागं पार्श्वसंगीताप्रमाणं त्या पहिल्या चार ओळी झंकारत होत्या. कामं आटोपून परत येताना, सायंकाळच्या उन्हाच्या स्पर्शानं, पुढील चार ओळींत उमटलेल्या स्वप्नांच्या आकृती झळाळल्या. पहिली कविता तिथं पूर्ण झाली. परंतु त्या ओळींत घरअंगणांत बंदिस्त झालेल्या उन्हाची स्वप्नंच तेवढी प्रतिबिंबित झाली होती. पृथ्वीआकाश कोंदून उरलेल्या उन्हाचा संपूर्ण अनुभव त्यांत शब्दांकित झाला आहे, असं वाटेना. मन अशांत, उत्सुक बनत होतं. उतावीळपणानं उन्हावरच रेघोट्या ओढीत होतं. लोकल भराभर स्टेशनं घेत, धावत होती. रुळांच्या दोन्ही बाजूंची दृश्यं झरझर पालटत होती. ऊनदेखील गाडीबरोबर वेगानं धावत होतं. जोगेश्वरी मागं पडली; गोरेगाव येत होतं. त्या सोनेरी उतरत्या उन्हात, कुठंतरी ताडाच्या उंच झाडाची लांब सावली सरकून गेली. झाडांच्या माथ्यावर मावळती उन्हं तळपत होती. डोंगरकाठांनी पांढरेकाळे ढग फेसाळून उतू जात होते. ते पाहता पाहता मनात एकदम ओळ चमकली (त्याआधीच्या काही ओळी नंतर सुचल्या) :

"तेव्हा काळ स्तब्ध होतो, उभा राहतो,
ताडाचे झाड होऊन,
उंचच उंच, आश्चर्याच्या सावलीसारखा!"

त्या सावलीनं, त्या ओळीत, उन्हाच्या एका अपार रूपाचा साक्षात्कार झाला. जोडकवितेतली दुसरी कविता सशब्द झाली. सगळाच्या सगळा उन्हाचा अनुभव प्राशन केल्यासारखं मनाला तृप्त वाटलं. मीच सर्वांगानं ऊन झालो. सारी सृष्टी, हे जगणंच

ऊन होऊन गेलं. आणि या उन्हाचं नातं कनकपात्रानं झाकलेल्या, उपनिषदातील सत्याच्या सूर्यमुखाशीही जोडलं गेलं. त्याबरोबर माझ्यासमोरचं ऊन, ताडाचं झाड, ढग, उतू जाणारं चुलीवरचं दूध, सारं सारं क्षणात मावळून गेलं; अन् मनात भरून राहिली उन्हाकार झालेली मनोवस्था—एक भावस्थिती!

कविता लिहिताना मला जाणवलेला आणि आता आठवणींनी व कवितांच्या ओळींनी जोडलेला हा अनुभव आहे; त्या कवितेचा अर्थ नव्हे. कदाचित दुसऱ्यांना आणखी काही वेगळं त्यातून जाणवेल. या कवितेच्या आधारानं मी माझी निर्मिति-काळातली मनोवस्था, भावानुभवाची रूपं आणि सर्जनाची मला जाणवलेली प्रक्रिया रेखाटण्याचा यत्न केला आहे. मघाशी गाडीबरोबर धावणारी उन्हं पाहून, उन्हाचं दुसरं स्व-अतीत रूप झटकन मनात जागं झालं, असं मी म्हटलं. पण ते तसंच झालं असेल असं निश्चितपणानं सांगता येणार नाही. तितकं निश्चित ते नसतंच. माझ्या असंज्ञ मनाच्या (unconscious mind) तळाशी बऱ्याच काळापासून अशा प्रकारच्या अनेक समान, सहचारी संवेदना साठत आल्या असतील आणि त्यांनी या क्षणी ही प्रतिमारूपं धारण केली असतील; कुणी सांगावं? कवीचं मन म्हणजे जीवनाच्या निखाऱ्यावर उकळणारं एक मृत्तिकापात्र असतं. त्यात अनेक अनुभव, संवेदनरस उकळत असतात. अतर्क्य पद्धतीनं कोणत्या अनुभवसंवेदनेची कोणती मूस अनपेक्षितपणे तयार होईल, काही सांगता येत नाही. या कारणानंच 'मोहिनी'स बघून, बालकवी निर्भर होऊन गातात :

"सौंदर्यभरीं भरलेलें तारुण्य चढे रंगास
अलवार कोंवळें अंग जशि काय फुलांची मूस."

या सृष्टीत अलवार अंग असतं. फुलंही असतात. पण फुलांची मूस मात्र कवीच्या मनातच तयार होते. कवीच्या मनातलं कल्पनीय वास्तवात अशा रीतीनं प्रवेश करतं तेव्हा काव्याची सृष्टी होते. ही काव्यवस्तू जीवनातल्या वास्तवापेक्षा वेगळी असते. त्या वस्तूची ती प्रभा असते.

वास्तव आणि कल्पनीय या दोन भिन्नधर्मी घटकांचं अस्तित्व काव्यात असतं, याचा उल्लेख वर आला आहे. वास्तव हे जीवनातील घटनाप्रसंगांतून, अनुभवांतून हाती येतं; तर कल्पनीय चिंतनातून जन्म पावतं. ही दोन्ही तत्त्वं जिवंत व उन्मेषशाली असतात. एक काव्यानुभव साकार होत असताना, हे दोन्ही अनुभव स्व-अतीत होतात आणि त्यांना अनुभवाचं आणखी एक तिसरं परिमाण लाभतं. 'तळे' या कवितेच्या आधारानं या रूपाचं नेमकेपणानं वर्णन करता येईल. माझ्या घरासमोर एक तळे आहे (आता 'होते' म्हणायला पाहिजे). या तळ्यात पूर्वी सकाळ-संध्याकाळची शोभा सांडत असे. सूर्योदयाची, दिवसाची व रात्रीची, त्याच्या पाण्यात बिंबलेली शोभायात्रा पाहत मी तासचे तास घालवीत असे.

एका सकाळी उगवतीचे तांबूस रंग तळ्यात बिंबले. ते मला कसे जाणवले?

“कोवळी तांबुस लव प्रकाशाची पाणभुईवर,...
त्यांतूनच उमलतो काळ
झुळझुळत्या रेशमी जळाच्या कळ्यांत
स्फुरण्या-विरण्याची निळी लयकारी साधून,
पांढऱ्या कमळांचा गंध घेऊन,
त्याचा रंग लेऊन,”

ही केवळ सकाळ नव्हे. उगवता काळच सारं अवकाश व्यापून उरला आहे, आपल्या विजयपताका फडकावीत.

पण संध्याकाळी अंधार पाण्यात उतरला तेव्हा—

“अवकाशात काळाचे खडक
पाण्यात थिजलेले वारे
दिशांचे श्वास रुद्ध झालेले
पांढरे कमळ पाण्यात बुडालेले :
स्तब्ध उभा काळाकभिन्न, निगूढ अवकाश
काळाच्या मस्तकावर पाय देऊन
नक्षत्रांचा.”

आता काळोखात काळाची गती, त्याचं स्फुरण संपलं आहे. काळा अपार अवकाश त्याच्या मस्तकावर पाय देऊन उभा आहे, नक्षत्रांकित. दिवसाची आणि रात्रीची तळ्यात विंबलेली दोन साधी दृश्यं ही. परंतु, कल्पनीयानं त्यात स्थळकाळांची रूपं निर्माण केली. त्यांची सनातन झुंज दाखवली, एवढंच नव्हे तर त्या एकाच दृश्याच्या रूपरंगशोभेनं काळाची व अवकाशाची रूपं धारण केली त्या पाण्यात. जळात काळ अवकाशरूपात बदलून गेला; आणि ज्याला आदि-अंत नाही असा अपार अवकाश, काळाच्या जन्मापूर्वीचा जड, अचल अवकाश, प्रत्यक्ष झाला. या आदिअंतरहित अवकाशाच्या, अज्ञाताच्या जाणिवेनं वृत्ती भयकातर होते. एक शून्यता हृदयावर राज्य करू लागते. कवितानिर्मितीच्या प्रक्रियेतली एक वेगळी अवस्था इथं जाणकाराच्या लक्षात यावी. कवी सकाळच्या व संध्याकाळच्या निसर्ग-सौंदर्याचा वास्तव अनुभव शब्दांकित करीत असतो. त्यात कवीचं कल्पनीय स्थळ-काळाचं दर्शन घडवू पाहतं. परंतु हे दोन्ही अनुभव एका विशिष्ट बिंदूवर स्व-अतीत होतात आणि कवीला, निसर्गाला बाजूला सारून, भयकंपित करणाऱ्या काळाच्या व अवकाशाच्या द्वंद्वातून, संघर्षातून, त्याच्या पलीकडे उभी असलेली जगाची अर्थ-हीनता, आदि-अंतहीनता, भयाण उजाड रितेपणा, यांचा अनुभव शब्दांत व्यक्त करतात. इथं कवीचा पराभव होतो; पण कवितेचा विजय होतो. तिला आणखी निराळं परिमाण लाभतं.

ह्या निवेदनावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट व्हावी. माझ्या मनात कवितेसंबंधीची काही पूर्वकल्पना तयार नसते. तिचा शेवट कुठं, कसा करायचा हेही ठरलेलं नसतं. उत्कटतेनं व्यक्त होऊ पाहणारा अनुभव जी भावरूपं घेऊ पाहतो, त्याला ती रूपं मी स्वच्छंदपणानं घेऊ देतो. ती रूपं धारण करण्यासाठी हवे असलेले शब्द तेवढे मी त्याला पुरवतो. दुसरं, दोन भाग किंवा दोन कविता करून रचना करावी, असं नियोजनही त्यामागं नसतं. जाणवलेल्या अनुभवानं सांगितलेलं ते फक्त शुद्धलेखन असतं. एखादा अनुभव स्पंदित होतो. काही ओळींत तो आविष्कृतही होतो. त्याचं रूप त्याला मिळालेलं असतं. काव्याचं स्तबकही तिथं पूर्ण झालेलं असतं; तरीही तो अनुभव अजून थांबलेलाच असतो,—आपल्या काही पाकळ्या विकसित होण्याची वाट पाहणाऱ्या गुलाबपुष्पाप्रमाणं. अशा स्पंदित, अस्वस्थ क्षणी त्या अनुभवस्पंदातून दुसऱ्या कवितेचा जन्म होतो. मग द्विदलात्मक जोडकविता तयार होते. अनुभवांतर्गत असलेल्या ह्या अस्वस्थतेत, अपूर्ततेत त्या दुसऱ्या कवितेचं स्फुरण असतं. पहिली कविता लिहीत असतानाच, त्या द्वंद्वात्मक स्पंदांतून दुसरी कविता आकार घेते; त्या वेळीच किंवा त्यानंतर बहुधा त्या दिवशीच ती लिहिली जाते. काही काही वेळा दुसरी कविता लिहायला दोनतीन दिवसांचा अवधीही लागतो. परंतु तिचं बीज मात्र त्याच दिवशी मनात रुजू लागलेलं असतं. पण असे प्रसंग क्वचितच आले आहेत. बहुतेक कविता एकाच दिवशी लिहिल्या गेल्या आहेत. नंतर त्यात मी सुधारणा केल्या आहेत; पण मूळ संहिता स्थूलपणे त्याच दिवशी तयार झालेली असते. दोन कवितांच्या मधला काळ मात्र फार अस्वस्थतेत जातो. ते असो. मला वाटतं, माझं हे सांगणंदेखील उपरंच आहे. दोन कवितांतील अंतर्गत संगती ही स्वतःच फार बोलकी असते.

काव्याचा रूपबंध त्याच्या आंतरिक संघटनेनं मुख्यतः साकार होतो. त्याला साकार करणारी ही शक्ती म्हणजे अनुभवाचं सौंदर्यात्मक स्पंदन. हे स्पंदन मानसिक व सौंदर्यरूप असतं. त्याच्यापासून कोणत्याही काव्याचा किंवा कलेचा घाट अथवा रूपबंध वेगळा करता येत नाही. माझ्यापुरतं मी एवढंच म्हणेन की रूढ आविष्कारापेक्षा काही वेगळ्या, काही जास्त अवकाशासाठी माझं कविमन उत्सुक होतं, अस्वस्थ होतं, आणि हा अधिक 'अवकाश' (वसअत्) माझ्या अनुभवबंधाला या कवितांत मिळाला आहे असं मला सध्या तरी वाटतं, एवढंच मी इथं नम्रपणं सुचवू इच्छितो.

या संदर्भात मराठी भावकवितेच्या रूपबंधाचा विचार केला, तर तो अप्रस्तुत ठरू नये. सध्या आपल्या काव्यक्षेत्रात रूपबंधाचे पुढील प्रमुख प्रकार रूढ आहेत : (१) भावकविता, (२) नाट्यगीत, (३) रुबाई/कणिका, (४) सुनीत, (५) दशपदी. यांतील शेवटच्या तीन प्रकारांना ओळींचं बंधन आहे. रुबाईला चार ओळींचं, कणिकेला पाच किंवा सहा ओळींचं, सुनीताला चौदा ओळींचं, तर दशपदीला दहा ओळींचं. अशा रीतीनं ओळींचं बंधन रूढ झाल्यामुळं तेच सामान्यतः रूपाचं (Form) व्यवच्छेदक लक्षण मानण्यात आलं. सुनीताच्या बाबतीत मात्र थोडा

भेद करण्यात आला आहे. त्याच्या रूपबंधामागील कल्पना प्रगतिदर्शक आहे. कारण ती तिथं अर्थानुगामी झाली आहे. तरीही ओळींचा काच सुटलेला नाही. या ओळींचे १२ + २ किंवा ८ + ६ असे आशयानुगामी दोन भाग कल्पून सुनीताची रचना करण्यात येते; आणि मुळातल्या अनुभवाला पुढल्या दोन किंवा सहा ओळींत वेगळी कलाटणी देण्यात येते किंवा मूळ भावनेचा उत्कर्ष साधण्यात येतो. दशपदीत दहाच ओळी असतात; पण दहा ओळींना लागेल एवढाच आशय-अनुभव प्रतिभाचंचूनं कविमनातून टिपला जातो, असं सांगण्यात येतं. मला हे दोन्ही प्रकार थोडेफार कृत्रिम व कोष्टकी वाटतात. पहिल्या प्रकारात रचनेची पूर्व-नियोजित कल्पना मनात असते, तर दुसऱ्यात अनुभव मोजण्याचं माप कवीजवळ असावं असं मानावं लागतं. प्रतिभाशक्तीला केवळ मापाचं किंवा ताजव्याचं रूप येतं. कवीजवळ अशा प्रकारचं माप असतं, असं मला वाटत नाही; असूही नये. त्यामुळं प्रतिभाप्रेरित, मुक्त व सर्जक अनुभवसंवेदनेला गौण, जड, चैतन्यहीन स्थान प्राप्त होतं. कलाविष्काराला रूपाचं असं बंधन नसतं. प्रत्येक कविता, कलाकृती आपला रूपबंध घेऊन येते, असंच मला वाटतं.

थोड्या वेगळ्या अंगानं काव्यरूपाचा विचार करताना मला असंही जाणवलं की अनुभवाचं स्फुरणच मुळात द्वंद्वात्मक आहे. त्याचं रूप द्विदलात्मक असतं. हे विश्वदेखील मुळात एक द्वंद्वात्मक स्फुरण आहे. काही तत्त्वज्ञानी त्याला द्वंद्वात्मकच मानतात. प्रकृति-पुरुष, स्थल-काल, पृथ्वी-आकाश, जन्म-मृत्यू, प्रकाश-अंधार, चेतन-अचेतन, स्त्री-पुरुष, सत्-असत् अशा द्वंद्वांनी हे जग नटलेलं आहे. श्वासावर जगणाऱ्या जगाला निःश्वास अपरिहार्य होतो. तेव्हा अशा जगाच्या अनुभवाचं स्वरूप आणि त्याचा कलात्मक आविष्कार द्वंद्वरूप असणं नैसर्गिक नाही काय ? उठणं-पडणं, फुलणं-सुकणं, श्वास-उच्छवास, उत्पत्ति-विनाश, अशा द्विविध गतीनं, पण एकाच मंडलात, या विश्वाचं चक्राकार भ्रमण चालू असतं. स्वाभाविकपणंच त्याच्या अनुभवाच्या स्पंदनाचे पडसाद जीवनात तसेच उमटतात. उत्कट, एकजिनसी परिणाम साधावा म्हणून, आपल्या सोयीसाठी, कवी काव्यात अनुभवाचं एखादंच रूप निवडतो. वस्तुतः अनुभवाचा द्वयस्पंदी आविष्कार माणसाला सत्याच्या, सौंदर्याच्या अधिक निकट नेणारा असतो. निदान त्याला ते शक्य व्हावं अशी अपेक्षा आहे.

खरं पाहिलं तर अनुभव हा बहुमुखी व सहस्ररूपी आहे. तो कामरूप आहे. क्षणाक्षणाला, पळापळाला, इच्छेनुसार तो अनंत रूपं धारण करतो. "सहस्रशीर्षः पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद" असाच तो आहे : पुरुषसूक्तातील आदिपुरुषासारखा. त्याचं हे रूप काळापेक्षाही अधिक चैतन्यमय व गतिमान आहे. तेव्हा मानवी बुद्धीला व कल्पनेला आणि त्यातल्या 'बापुड्या' कवीला अशा अनुभवाच्या वेगाबरोबर धावणं—आणि तेही शब्दांचा भार डोक्यावर घेऊन, तो सांभाळीत धावणं—अत्यंत कठीण आहे.

या विराट अनुभवाचं आकलन व्हावं म्हणून या विश्वाच्या द्वंद्वरूपाचं रहस्य समजावून घेतलं पाहिजे. या द्वंद्वातच त्याच्या अस्तित्वाचं आणि सौंदर्याचं स्फुरण असतं. या स्फुरणाच्या स्वरूपाचं वर्णन ज्ञानदेवांनी किती सूक्ष्मतेनं, किती सुकुमार शब्दांत आणि कसं उत्कट व बहारदार केलं आहे, ते पाहण्यासारखं आहे.

"उठणें कीं पडणें । कुचभाराचें कोण जाणें
फाकणें कीं सुकणें । जाउळांचें ॥"

उठणं आणि पडणं, फाकणं आणि सुकणं, यांच्या स्पंदनात जाईच्या फुलांचं आणि स्तनांचं सौंदर्य स्फुरण पावतं. स्तनांच्या प्रतिमेनं कामिनीचं आणि कवितेचं सौंदर्य-रूपच नव्हे, तर स्त्रीरूपधारिणी सृजनशक्तीचं, विश्वाच्या अखिल अस्तित्वाचं सर्जनशील रूपही अभिव्यक्त झालं आहे; त्याचं स्फुरण, स्पंदन प्रतिमित झालं आहे. 'दोनुली'तल्या काव्याला अशा स्पंदनाची स्पृहा आहे, आणि ही स्पृहा म्हणजे केवळ आविष्कारबंध नाही, तर एक अनुभवबंधही आहे. अपरिहार्य आविष्काराच्या द्वंद्वरूपात त्याचं रूपसौंदर्य आहे, पण आत्मा त्याच्या अनुभवबंधाच्या एकात्मतेत आहे. हे 'दोघुलेपण' 'दोनुली'ला अभिप्रेत आहे. गंगा-यमुनासंगमाच्या प्रतिमेच्या साहाय्यानं ज्ञानदेवांनी या द्वंद्वमय जगाचं आणि त्याच्या अंतरीच्या अद्वैताचं मोठं सुंदर, साजुक वर्णन केलं आहे. मला वाटतं, ते वर्णन मला अभिप्रेत असलेल्या रूपबंधाच्या कल्पनेलाही समर्पकपणं लागू पडतं. म्हणून ती ओवी इथं उद्धृत करण्याचा मोह मला आवरता येत नाही :

"गंगा यमुना उदक । वोघ बगे वेगळीक
दावी होऊन एक । पाणीपणे ॥"

सूक्ष्म दृष्टीनं या कवितांतल्या अनुभवस्पंदांकडे पाहिलं, तर त्याचे आणखीही काही पैलू नजरेला येतील. काही स्पंदनं समवर्ती, समांतर असतात, तर काही व्यावर्तक असतात; काही परस्परविरोधी, तर काही परस्परपूरक. ही स्पंदनं अमुक एका रीतीनं व अमुक एका रूपात निर्माण होतील, असंही सांगता येत नाही; तरीही अनुभवांमागील जाणिवांची कक्षा वाढावी, हीच अपेक्षा त्याच्या तळाशी होती असं, ह्या कविता लिहून झाल्यानंतर, आज मला जाणवतं. मात्र लिहिताना काहीही अपेक्षा नव्हती. अनुभवसौंदर्याच्या दर्शनाची केवळ उत्सुकता होती.

ही दर्शनं कवी किंवा कलावंत सौंदर्यानुभवाच्या माध्यमातून अनुभवतो; आणि तिथं तो अनुभव आविष्काररूपच असतो. या ठिकाणी ही गोष्ट स्पष्ट करायला हवी, की काव्याच्या, कलेच्या सृष्टीत सुरूप-कुरूप, क्रूर-अक्रूर, भयाण-भयंकर, बीभत्स-अश्लील या जीवनातल्या सर्व गोष्टी सुंदरच असतात. कारण वास्तवाचा शोध हाच स्वयमेव एक सुंदर अनुभव असतो. या वास्तवाच्या प्रदेशातूनच कलात्मक शोधाची वाट जात असते. त्यातून कविता हा तर स्वतःचाच शोध असतो. कवीच्या बाबतीत हा शोध त्याच्या अस्मितेचा, स्वातंत्र्याचा शोध असतो. तरीही कशाचा शोध

घेतला, काय गवसलं हे कवी किंवा कविता कधी सांगत नाही, सांगू शकत नाही. कविता शोधाच्या प्रेरणेला फक्त चालना देते. गती देते. समाधान, तृप्ती हे कवितेचं साध्य नाही. उलट, एक अथांग, अपार अशांती, अस्वस्थता निर्माण करणं, जीवनाच्या अनंत शक्यतांचा शोध घेण्यासाठी माणसाला छळणारी चिरंतन अतृप्ती त्याच्या अंतरात जागवणं, हेच कवितेचं कार्य असतं. असा शोध माणसाच्या जीवनाला अर्थपूर्ण अनुभूतीचं स्वरूप देऊ शकतो.

या शोधात मला असं जाणवतं, की इथल्या अर्थाला अर्थहीनतेचे किनारे आहेत; आनंदी हास्याच्या फुलांवर अश्रूंचं दव साचलं आहे; जीवनप्रकाश देणाऱ्या सूर्यबिंबावर अंधाराची अथांग जळती विवरं आहेत; इथल्या चांदण्यातही माणसावर जळण्याची पाळी येते. हा माणूस कालबद्ध आहे. अवकाशात कोंडला आहे. माणूस असूनही त्याला माणूस होता येत नाही. त्याची प्रीती, सौंदर्य यांनाही कलंकाचा स्पर्श झाला आहे. 'क्रौर्यानं' त्यांना पायदळी तुडविलं आहे. समाज आणि सत्ता या दोघांनी, प्रत्येक काळात, या माणसाची वाणी डागून सीलबंद करण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही तो अजून मुक्तपणे गाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या गाण्याच्या लय-छंदात, चिंतनात, स्थळ-काळाची, वास्तव-अवास्तवाची बाह्यरूपं, ठराविकांची चित्रं अदृश्य होतात आणि चिंतनच चित्रमय होत जातं आणि त्या क्षणी उरते वस्तूची प्रभा—त्या त्या क्षणांची त्या त्या अनुभवस्पंदाची भावस्थिती होऊन, भावस्थितीचा क्षण बनून! हे क्षण पकडण्याचा अल्प प्रयत्न, काही धडपड या कवितेनं केली आहे, एवढंच प्रामाणिकपणे नमूद करण्याची शेवटी मी परवानगी मागतो. ही धडपड 'सार्थ'की लागली की नाही ते रसिकांनी ठरवावे.

शेवटी ज्या मित्रांच्या प्रेमळ शब्दांनी गेली बारा वर्षे एका धुंदीत या कवितांचं लेखन मी करीत राहिलो, त्यांचे मला आभार मानले पाहिजेत. या कवितेचाही मी फार फार ऋणी आहे. कवितालेखनाच्या त्या धुंदीनं अनेक आपत्ती व मनस्ताप सहन करण्याची शक्ती मला दिली आहे. तिनं त्या व्यथावेदनांत मला जगवलं आहे. 'शिवेतरक्षतये' असं कवितेच्या ज्या मंत्रशक्तीचं मम्मटाचार्यांनी वर्णन केलं आहे, तिचा वेगळ्या व मर्यादित स्वरूपात मला प्रत्यय आला आहे, हे सांगताना मला मुळीच संकोच वाटत नाही.

गेली दोन तपं माझ्या अल्पस्वल्प लेखनाचं प्रेमानं स्वागत करत आलेले माझे सहृदय मित्र प्रा० श्री० पु० भागवत यांचाही मी फार आभारी आहे. त्यांनी या कवितेत रस घेतला आणि मौज प्रकाशनातर्फे अल्पावधीत आणि सुंदर स्वरूपात तिचं प्रकाशन केलं याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ही उपचाराची भाषा त्यांना आवडत नाही हे मला माहीत आहे. 'उपसाहिजो जी' एवढीच विनंती मी त्यांना करतो आणि थांबतो.

१/६८, श्रीसर्वोदय हौसिंग सोसायटी
मुंबई ४०० ०५७
३१-७-१९७९

—वा० रा० कांत

## रान : १

उभे ताड उंच टेकडीवर
हजार हजार :
हिरवीहिरवीगार प्रश्नचिन्हे
उठलेली डोंगराच्या अनंत शंकांची
जन्मापासून अमिष्ट पृथ्वीच्या.
उत्तरे त्यांची स्फुरणारी, विरणारी
घुम्याशा धुक्यात,
सोनेरी उन्हाच्या वेड्या चौकोनांत.

## रान : २

हिरवेचार रान :
सांडलेले भान;
पलीकडे डोंगर; मधे चंद्राकार, खोल, तुटलेला
तिरपा खोवलेला त्यात
आभाळाचा तुकडा, निळा निळा;
जिथे वर्तमान
हरवून बसला
पायथ्याच्या पाखराची
सकाळची शीळ.

## पाणी : १

ओढ्याची ओढ तोडून थांबलेले,
खिन्न, शेवाळलेले,
हिरवे-निळे पाणी :
पिवळ्या पानजाळीत
तारवटलेला डोहाचा डोळा :
साचलेली झोप उजाड रानाची,
निष्पर्ण झाडांची;
फडफडत जाणारे त्यात दिवास्वप्न
पांढर-कवड्या पंखांचे.

## पाणी : २

क्षितिजाशी कधी पाकळीगत मिटते
वादळलाटांनी गिळून आकाश,
पुन्हा उगळते
समुद्राचे पाणी; उन्हात मोहरते,
चांदण्यात पिकते पुनवेच्या रात्री,
मोत्यांच्या दाण्यांनी.
शेवटी उरते नुसते मीठ
चंद्र-चांदण्याचे, भव्य अनंताचे,
विश्वात भरलेल्या ब्रह्मानंदाचे
नुसते मीठ : आसवांतल्यासारखे.

## वारा : १

पानांचा खोपा बांधायचा होता—
अचानक झाडच निष्पर्ण झाले.
चढला वारा आभाळात वादळ होऊन
प्रमत्त, पृथ्वीची वळकटी करणारे;
धुळीचे स्तंभ पेटले, खचले;
प्रक्षोभांचा मनोरा निवारा न झाला.
फुलांनी लोटल्या सुगंधासारखा फिरतो रानीवनी
नष्टनीड आत्मा
मोजीत रेषा पानांच्या, दैवाच्या!

## वारा : २

वेळूच्या बनात मला म्हणतात सूर :
कंठावाचून, ओठांवाचून स्फुरणारा षड्ज-गांधार.
फुलांच्या गावात ओळखतात मला सुवास म्हणून
झुरणारा, वेडा, कुणा सुनास चाफेकळीसाठी.
लाटांचे ओठ, फेसाचे हसू, क्षितिजाशी ढगांत विजेच्या दाढा,
समुद्रपणात खिदळणारा, रगडीत करकरा धरणी-आकाश…
पण खरे सांगू?—अजूनही मी मला पाहिले नाही
वघून हजारदा डोक-डोकावून
प्रचंड आरशांत युगांएवढाल्या.
दिसली फक्त पिवळी पाने,
सुकलेल्या पाकळ्या
उन्हाच्या ऐन्यात.
असेन, आहे मी,
तरीही सारखे वाटते, वाटावे,
—बरे असते ते—
सुवासाचे मरण जगणारांसाठी.

## ऊन : १

काजळलेल्या अवेल्यावर,
शेवाळलेल्या भिंतीवर
उन्हे पडली वटकाभर
तेव्हा कळले त्यांनाही स्वप्ने असतात :
उतू जाणाऱ्या दुधाची, ऊन ऊन तूपभाताची,
टोपपदरी स्मिताची,
नथेतल्या स्नेहाळ पाचूची,
मोत्यांतल्या थबकल्या वादळाची[1],
लवलवत्या मखमालीची,
मातीच्या उगण्याची, सूर्याच्या नात्यांची,
पुनःपुन्हा पडणारी
निद्रेविणा, डोळ्यांविना.

## ऊन : २

ओल्या हिरव्या पानापानांत उन्हे दाटतात,
डोंगराशी उतू जातात,
क्षितिजाच्या काठांनी, शुभ्र ढगांनी भरभरून,
तेव्हा काळ स्तब्ध होतो, उभा राहतो,
ताडाचे झाड होऊन,
उंचच उंच, आश्चर्याच्या सावलीसारखा !
—जिथे रिते अवकाश वितळते
रानामधल्या सोनसावल्यांत.
त्या क्षणी काही कळत नाही, काही शिवत नाही;
उरते एक अपारपण
मनामनाच्या भेटीचे,
विचुंबित मुखाच्या श्रांत तृप्त कांतीचे,
तरीही अस्पर्शित राहणारे,
गवताच्या पात्यावर थरथरणारे,
गवसून न गवसणारे,
उनासारखे, ऊनच होऊन
साऱ्या साऱ्या जगण्याचे,
सत्यमुखीचे कनकपात्र दूर सारणाऱ्या सूर्याचे.

## तळे : १

निळेभोर तळे,
उज्ज्वल आकाश प्रभातरल,
कोवळी तांबूस लव प्रकाशाची पाणभुईवर,
निःशब्द निश्चल जळबंदी अवकाश :
त्यांतूनच उमलतो काळ
झुळझुळत्या रेशमी जळाच्या कळ्यांत
स्फुरण्या-विरण्याची निळी लयकारी साधून,
पांढऱ्या कमळांचा गंध घेऊन,
त्यांचा रंग लेऊन,
सकाळच्या उन्हात.

## तळे : २

सांजावले आभाळ
सांजावले तळे
गंजून गेली, काळी पडली सकाळची धुंद
अंधार भरला तळ्यात
अवकाशात काळोखाचे खडक
पाण्यात थिजलेले वारे
दिशांचे श्वास रुद्ध झालेले
पांढरे कमळ पाण्यात बुडालेले :
स्तब्ध उभा काळाकभिन्न, निगूढ अवकाश
काळाच्या मस्तकावर पाय देऊन
नक्षत्रांचा.

## चांदणे : १

उगवता चंद्र :
गोल खांदा तुझा गोरा गोरा,
पाठमोरा.
स्वच्छ चांदणे : तुझ्या मनासारखे
निकट असून किती दूर-दूर,
स्पर्शूनही पुन्हा अस्पृष्ट,
हरवलेले त्वचेच्या रानात.

## चांदणे : २

तळावले चांदणे
जळ आकाशले
तरंगावला वारा हळुवार, काठाकाठाने;
झाडांच्या स्तब्ध हिरव्या-काळ्या छाया :
प्रगटले जळात पृथ्वीचे मनोगत;
दिवसाच्या कोलाहलाचा झाला आत
अबोल रंग;
मौन, चंद्रभोगी रात्रीचा प्रहर :
चांदण्याचा बिंदू जड, अचल
तरीही अनिवार :
अवघा काळ जिथे स्थिरावतो
आणखी जिथून कोसळतो पुन्हा
चंद्रकिरणांनी, अनंत, धूसर;
वाहू लागतो अवकाश
चांदणी रात्र होऊन.

# कमळ

## कमळ : १

पापणी मिटते,
प्रकाशही मिटतो,
डोळयांत, डोळयांपुरता,
बाहेर अफाट उजेड असतो
पसरलेला क्षितिजापल्याड,
हे कमळाला कळते तेव्हा
ते उमलते.

## कमळ : २

पाण्यात वेल उगवते,
पानांनी पिऊन टाकते सारे पाणी
तळयातले.
आक्रोशते जीवन
पानांखालच्या बंदिस्त काळोखात.
कुठे तरी तडा जातो हिरव्या अंधाराला :
फुलते, लवते पांढरे कमळ
अजाण प्रार्थनेसारखे, मौन, एकाकी नमस्कारासारखे.
आरस्पानी जळात
हासते, खेळते त्याचे लवलवते प्रतिबिंब :
तेवढाच आनंद
फुलणारा, बुडणारा
आपल्या चतकोर बिलोरी चौकोनात,
समुद्राएवढा.

## अंधार : १

जळात साचणारा
तारांत थरकणारा
संध्याकाळचा तलम अंधार,
अजून ज्यातून शिवत असतो
मावळलेला दिवस :
धुंद रेशमी उबारा फेडलेल्या वस्त्रातला,
श्वासगंधी, देहस्वी.

## अंधार : २

दोन बाहूंच्या, दोन देहांच्या
गच्च आलिंगनात घुसमटणारा,
गात्रागात्रांतून फुटू पाहणारा,
ऊन ऊन श्वासांत घामेजलेला, अस्ताव्यस्त अंधार :
दिवसरात्रीच्या मांड्यांतला अंधार
मध्यरात्रीचा, केसाळ, स्पंदणारा,
जीवन-मरण शोषून घेणारा,
धुक्याच्या पांघरुणात जिथे
सूर्य हालतो आहे
तेजाच्या साळीसारखा,[१] रेतःकणासारखा,
अथांग अवकाशाच्या योनिकमलात.
वाकलेले आकाश तसेच : ऊर्ध्वरेता;
खाली धरणी थरथरणारी, मोहरणारी :
ऋतुसंहारिणी!
बिलगणारे देह, विलगणारी मने :
दोघांत पहिल्यासारखाच
अलक्ष अंधार, अनोळखी,
निःसंग.

## तारा : १

हा एक तारा, तो एक तारा :
दोन टिंबे तेजाची;
त्यांना जोडणारी, त्यांचे अस्तित्व जपणारी
एक रेषा अंधाराची,
तळपत्या किरणांची, जांभुळत्या आभाळाची,
काजळत्या ढगांची, जळत्या विजांची,
जडावल्या डोंगराची, उसळत्या समुद्राची,
हालत्या हिरव्या झाडांची, वळत्या वक्र किनाऱ्यांची,
पानांतील पिवळ्या शिरांची, देहातील निळ्या नसांची,
नसांतील ऊन ऊन रक्ताची
रेषा, रेषा—रेषांचा गुंता नुस्ता!
ही सारी सृष्टी, हे ब्रह्मांड, तो ईश्वर—
सारे अजस्र 'डिझाईन' रेषांचे! अनाद्यनंत रेषाकृती!
एक भूमिती आनंदघन,
प्राचीन ईश्वरापेक्षाही—ईश्वरापूर्वीची :
दोन टिंबे तारांची
अन् एक रेषा अंधाराची...

## तारा : २

अनादी संकोचासारखा,
गलबलत्या अनामिक हुरहुरीसारखा
भुरभुरता अंधार.
त्याच्या मनात चमकत होत्या
पहाटरात्रीच्या मंद तारा :
तुकडे फुटक्या आरशांचे,
ज्यांत कधीच पाहता आले नाही
माणसाला वा ईश्वराला
आपले रूप.

## समुद्र : १

समुद्र : एक सावळी काळयाभोर लाटांची,
अनोळखी, अपार,
क्षितिजापलीकडून येणारी—
आदळणारी
पृथ्वीच्या काळ्या कातळकाठावर,
फोडीत साऱ्या स्मृती, साऱ्या खुणा
मागील विश्वाच्या, भूतकाळाच्या
उन्हाने तळपणाऱ्या भविष्यासह,
खळखळा हासत माडांच्या छायांत,
रत्नांच्या चुरात उगवतीच्या;
—आणि पुन्हा
शोषीत आपणच आपल्याला,
प्राशीत आपलीच तहान
तृप्तीने परतणाऱ्या लाटा,
ओंजळीत घेऊन निर्माल्य, करवंट्या,
मावळते सूर्य,
मिटत जाणारे हे सुकतीचे कळे.
अवघा समुद्रच एक अगाध, अद्‌भुत क्षण
जांभळा-जांभळा, अंतर्मुख.

## समुद्र : २

डळमळणाऱ्या आकाशासारखा
समुद्र आरपार; वर आकाश
ढगांनी भरभरून उतू जाणारे, समुद्रासारखे;
मध्यभागी एक इवला पडाव :
शुभ्र ठिपका पाण्याचा
उन्हाच्या झोतात तळपणारा;
नाखवा गाणारा :
हातातले वल्हे थांबलेले, विसरलेले;
भोवती सुरांनी मंतरलेला समुद्र
—गाणेच झालेला;

त्या गाण्यात पुन्हा एक समुद्र,
समुद्रात एक पडाव गात चाललेला,
पलीकडे सुरांनी बांधलेला किनारा
सूर्य-चंद्रांची स्वप्ने रुजविणारा,
अलीकडे सुरूंचा काठ, वनदाट,
पाखरांची शीळ उरात जपणारा;
भर समुद्रात दूर दूर जाणारा,
पाऱ्याचा ठिपका, नाखवा खुळा :
निर्वासित झालेला सत्यापासून,
स्वप्नापासून.

## औरंगाबाद : १

सरत्या रात्रीच्या डोंगरमाथ्यावर
अंधार निवळताना, धुके तरळताना,
ढगाला केशरी धुमारा फुटताना
क्षितिजावर ते लख्खन उमटते
तळपते अग्निकंकण :
थरथरती, धगधगती प्रकाशाची पाकळी.
झाडांमधून, उतरत्या किरणांवरून
वाहत येते सोन्याचे पाणी
हलके अधांतरी,
किलबिलती वारे इवलाल्या पंखांनी,
होते पानफूल शहारत्या अंगांचे,
गालांवर, डोळ्यांवर भुरुभुरू उडतात
मोरपिंशी म्हाताऱ्या सोनेरी किरणांच्या,
दिपलेल्या नजरेने बघतो जेव्हा
डोंगरावरती सूर्यनारायण :
उगवते आश्चर्य, हिरण्यगर्भ,
सनातन सकाळचे.

## औरंगाबाद : २

प्रकाशाची अजून उन्हे झाली नसतात;
ओस घरे, अवघडली झाडे कुशीवर वळतात;
दारांना टेकून रिकामे रस्ते आळोखे देतात;
जख्ख वाकल्या, मख्ख तटबंद्या पाहत बसतात,
रात्रीपासून, पळताना इथून हजार हजार पाय
फुटलेले भीतीच्या मुक्या गाटोड्यांना;
'रंगमहाला'च्या भिंतींनी कण्हत,
हुंदका दाबून पडल्या असतात म्हाताऱ्या झोपड्या,
चोरी असते ज्यांना सांगण्याची नावे
आपल्या कुशीच्या मेलेल्या पोरांची;
'मारो, काटो, जला दो शहर'—रात्रीच्या वल्गना
लोळतात धुळीत आता, विझलेल्या मशालीसारख्या.

चिरेबंद 'अचरज' : 'काळा दरवाजा' उभा पाहतो :
मुक्त शहर, भारतीय जवान, हिरव्या हल्मेटी,
वळत्या गाडीवर बसलेली तोफ लेऊन शेंदूर,
उन्हासारखा उधळलेला गुलाल चौकाचौकांत,
जिथे सांडले होते काल रक्त, अश्रू.
एक अद्‌भुत सूर्योदय मनामनाचा :
हरपालाच्या[१] ओल्या कातडीचा,
मुनी वसिष्ठाच्या सहिष्णू छाटीचा,[२]
ज्याला मुजरा करीत होती
एक सकाळ सप्टेंबरची.[३]

## दुपार : १

हिरवेपान तळे, झाडे हिरवीशीळ,
हिरव्यागार सावल्या हिरव्या बिलोर पाण्यात.
या हिरव्या क्षणात, या हिरवेपणात
फडफडते प्रतिबिंब शुभ्र, निरालंब :
आपल्याच कंठातील चीत्कार बनलेला
एक मुका पक्षी
नष्टनीड, आकाशवंचित,
दुपार-उन्हाच्या पिवळ्यापान मनात.

## दुपार : २

शिशिराची दुपार.
डबके हिरवे-पिवळे :
जीर्ण पिकले पान उन्हात गळालेले
आभाळातून, काळ्याभोर म्हशीसकट;
तेलिया तकतकीत ओल्या कातडीत तिच्या
तळपतो किरण
मृत्यूच्या चकण्या डोळयातील बाहुलीसारखा.
मृत्यू ?—होय, मृत्यू—
सावित्रीच्या दुःखमलिन डोळयांतल्या त्या जीवनोत्सुक दुपारला
आयुष्याचा अर्थ विचारणारा मृत्यू—
सनातन वडाखाली…
… … … …
ही दुपार पाण्यातली, निर्मनुष्य, उदास,
रवंथ करते स्वस्थ, डोळे मिटून
म्हशीसारखी.

## शब्द : १

नव्हतेच काही   तेव्हा शब्द होता
शब्दरूप, सत्ता   नव्हत्याची
शब्द जगाआधी   शब्द जगाअंती
शब्द चंद्र स्वांती   अमृताचा
शब्द माझा धर्म   शब्द माझे कर्म
शब्द हेच वर्म   ईश्वराचे

## शब्द : २

शब्दालागी शब्द   चतुरा, दिलास
काय अनुभवास   अर्थ आला ?
केवळ शब्दांचा   झाला गुणाकार
वजावे आकार   वेधलावी
तरंगाची माळा   उठते जळात
पाण्याचा तो अर्थ   म्हणो ये का ?
अनादी अंधार   व्हावे मावळून
नसत्याची खूण   उमगाया
अर्थ प्रकाशाचा   भोगावा जळून
सुखे उजळून   ज्वालेमध्ये.

## अस्तित्व : १

उशीर का आता   पेटवाया चिता
आधीच पुरता   जळालो मी
मरणाचे नाव   जीवन ठेविले
जळता वाटले   सूर्य झालो
चेतला दुःखाचा   चंद्र अंतरात
भस्म चांदण्यात   देह झाला
आता सांगो लोकां   राखेचे ते ज्ञान
उपनिषद्गान   अस्तित्वाचे.

## अस्तित्व : २

साठविता डोळा   सूर्यनारायण
उडावे हे प्राण   अवचित
जळात, उन्हात   पाखरांच्या माळा
बिंबाचा सोहळा   प्रतिबिंबी
सहज गळावे   देहाचे या भान
पिकलेले पान   तळ्यामध्ये
बिंबतात झाडे   तीरीची पाण्यात
तसे कवितेत   नांदो आम्ही.

## आरामखुर्ची : १

पाकळयांचे फूल हवे पुन्हा ह्यांना जोडून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून
दिवस ढळून गेलाय समोरच्या माळात
फूलफांद्या हाडांच्या काकडल्यात हिवात
थोडा बर्फ केसांत, थोडे कण डोळ्यांत
विरजलेल्या उन्हाची कवडी द्या ना फोडून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

गालीची कुजबूज गुलाबांत बघतात
खिदळणे मुलांचे खळाळात शोधतात
गळालेल्या फुलांत मधूनच हरवतात
सृष्टीत दृष्टीचा पुन्हा दोरा द्या रे ओवून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

उंबरठे मोडले, वाटा बुजून गेल्या
पांघरल्या शेल्याच्या धांदोट्या झाल्या
भोगल्या चेहऱ्याच्या रेषा-रेषाच उरल्या
निषाद-निळ्या आभाळाला
पानगळीचा षड्ज पिवळा
द्याल का रे मिळवून ?
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

## आरामखुर्ची : २

पाहिलीत तुम्ही
व्हॅन गॉफची आरामखुर्ची ?
—म्हणजे त्याने रेखाटलेले चित्र.
पण ते असो.
तशी खुर्ची असते प्रत्येक एकान्त खोलीत
एकाकी, रिती, जांभईसारखी;
बाजूला उभे असतात उंच बूट, अचल,
पायाविणा;

त्यांतले पाय बाहेर गेले असतील,
नाहीतर येतील इतक्यात
लोटून दार,
कदाचित येणारही नाहीत—कधीच;
ती आरामखुर्ची मात्र वाट पाहत असते
कुणाची तरी
बुबुळे झडलेल्या डोळ्यांच्या खोबण्यांमधून :
अवघडलेली एक जांभई;
सरत्या रात्रीचे क्षितिज : दुसरी जांभई
आळसावलेली;
आणि लुकलुकतात नक्षत्रपुंज, जिथे
असाव्यात मोत्यांसारख्या दंतपंक्ती;
तरीही ती एक जांभईच.
सारे अथांग, आरपार...
तर ही व्हॅन गॉफची आरामखुर्ची
पाहते समोर खिडकीत
पेटलेले सूर्यफुलांचे वणवे.
तुम्ही पाहिलेत का ?
पाहा, पाहा एका फुलात तर
चक्क तुटका कान दिसतोय,
त्यावर 'बोर' झालेल्या
वेश्ये[1]च्या टिंगलखोर डोळ्यांतले अश्रू
आता बावरलेले आपल्याच चेष्टेने
आणि त्यांत चिंबली आहेत पुन्हा
जंगले सूर्यफुलांची[2],
व्हॅन गॉफने पाहिलेली, न पाहिलेली,
त्याची लाल सोनेरी दाढी
अन् दोन पिसाट डोळे,
झपाटलेले!

## रस्ते : १

पारूला पोलिओ झाला होता; अबदुल्लाला क्षय.
एक हात लुळा, एक पाय वाकडा तिचा; तो थुंकत होता रक्त बेडक्यांतून.
निसर्ग बेदरकार : ती मुसमुसली तारुण्यानं
फुलांनी फुलणाऱ्या वाकड्यातिकड्या डहाळीसारखी; त्याच्याही मनात
पालवली वासना दगडावर साचणाऱ्या शेवाळ्यासारखी,
ज्यावरून तो स्वतःच घसरून पडत होता कित्येकदा.
तिच्या बांधावरील फुलं कुस्करली मळा शिंपताना
उसाच्या धुंद आंधळ्या डोळ्यांनी; चालवीत होता तो
साचा खोकत खोकत, गिळीत धुरोळा कापसामधला.
हाकललं आईबापांनी, पोलिसांनी डांबलं अनाथालयात
शेंदून तिला विहिरीतून; त्याला कोंबलं इस्पितळात दयाळू गिरणीमालकानं.
बेबीचा देठ खुडल्यावर आली ती आरोग्यकेंद्रावर;
आला कामावर तोही, गमावून दोन फासळ्या.
ती केंद्रावर दूध विकीत होती; तोही यायचा तिथं;
ओतताना दूध त्याच्या ग्लासात उतू जात होतं तिच्या मनात काहीतरी, उगीच;
आणि दुधापेक्षा तिच्या नजरेची धारच प्यायचा तो भरभरून.
तो म्हणत होता, 'काठ वाकडा झाला म्हणून नदीचं पाणी
थोडंच वाकडं वाहतं ?' ती सांगत होती, उगाच नीट करून डोईचा पदर,
'माझ्या राजाचं काळीज किती शाबूत आहे,
मोठं आहे, दोन फासळ्या काढल्या तरी.'
... ... ... ...
बाहेर मात्र दोन गटांत लाठ्या चालल्या होत्या, फुटली होती डोकी
हिंदु-मुसलमानांचं हे लग्न कुणी लावलं म्हणून
—आणि कुत्र्याच्या बाहेर आलेल्या जिभेसारखा लळलळ
दिसत होता गल्लीतला रस्ता लाल, निर्मनुष्य.

## रस्ते : २

एक काळी कुत्री पडली होती रस्त्यावर डोळे मिटून.
भकाळी गेलेल्या तिच्या पांढऱ्या पोटाला लुचीत होतं पिल्लू
दुसऱ्याच एका मेलेल्या बांड्या कुत्रीचं, जी काल
चिरडली गेली होती मोटारीखाली : अन् हे आपलं

या काळीच्याच थानाला लागलं येऊन केकाटत, तिच्या
इतर चार पिल्लांबरोबर; तेव्हा तिनं दिला नाही नकार.
फुटपाथवरची भागी हे सारं पाहत होती टुक्रूर टुक्रूर.
भेदरलेल्या वेडसर डोळ्यांत चमकला गर्भ तिचा,
पोटातल्या पोटात चेचलेला तिच्या आई-मामांनी मिळून.
'वाचवा, वाचवा माझ्या बाळाला' किती रडलीभेकली ती;
द्रवले नाही कुणी; मात्र वाहिलं पांढरं पाणी अंगावर,
रक्ताच्या धारा, नंतर कोसळला मांसाचा कोथळा एक,
उंदराच्या आकाराचा, पायापासल्या थारोळ्यात.
हादरली झोपडी किंचाळयांनी तेव्हा, जरी मामानं
मुसक्या बांधल्या होत्या तिच्या; पोटातून, कमरेतून
कळा उठत होत्या ज्वाळेसारख्या, आतडी फाडणाऱ्या :
त्या आगीतच ती जळून गेली; बाहेर सांडली त्यातून
ही सावली, करपलेली, वेडीविद्री, भ्रमिष्ट.
कुठे कुठे भटकली ती शोधीत उकिरडे गावोगावचे.
ह्या पिल्लाएवढाच होता ना तो तिचा गोळा...
खदखदा हासत कवटाळलं तिनं त्या पिल्लाला,
वट्ट वट्ट, 'पी रे, पी ना आमा वेड्या, चोळी भिजली बब—'
तेव्हा समोरचा हसन्या तिला डोळा घालीत होता
खाजवीत मांडी. खदखदा हसत ती वेडी ओरडली,
'हसन्याऽ, कुत्रा आहेस मेल्या!' अन् ती पळत सुटली.
कुत्रीचं पिल्लू कुशीतलं तिथंच पडलं गळून.
संध्याकाळचा फुटपाथ शांत पसरला होता कुत्रीसारखाच :
झोपड्या तिला लुचीत होत्या, चुलींनी उजळलेल्या,
झापांचे डोळे मिटून.

## दाणे : १

कसे असते मरण ?
आकाशासारखे अथांग निळे
की निःस्तब्ध काळ्या समुद्रासारखे
जीवनखोल ? पण
त्याच्या तळाशी मासे पोहतात,
समुद्रफुले फुलतात,
वर निळेपणात
भिरभिरतात पाखरेही :
खोपा दिसतो का त्यांना पलिकडे ?
की दाणे नक्षत्रांचे असीमाच्या अंगणातले ?...
'दाने दाने पर लिखा है खानेवाले का नाम',
'मरावे परी कीर्तिरूपे उरावे'
शब्द शब्द नमकहराम !
भोवती सारा अंधार काळाकुट्ट
डोळ्यांत बोटे खुपसणारा.

## दाणे : २

पसाभर ज्वारी मागत फिरताना
कोसळला तो भिकारी
ठेच लागून निपचित,
तळतळत्या उन्हात, निर्जन रस्त्यावर.
टुळूटुळू बघत आहेत
दोन अजाण चिमण्या टिपीत
त्याच्या झोळीतून उधळलेले दाणे.
ते दाणे चैतन्याच्या उन्हातले
की मरणाच्या सावलीतले ?

## वार्ता : १

मोझांबिक, दि० २७ : चौकात
लटकत होते एक प्रेत झाडावर
वाळून, जुनाट फांदीसारखे.
'झिंदाबाद, शहीदे आझम झिंदाबाद'
गर्जत होते लोक गर्दी करून,
'स्वातंत्र्याकरिता प्राणाचा बळी दिला त्याने;
पसरतो असाच संस्कृतीचा, मानवतेचा
जीवनवड.'
त्याचे बसके घर दूर स्तब्ध होते
दाबलेल्या हुंदक्यासारखे
बाजूच्या गल्लीत, पलीकडे,
उत्तुंग इमारतींच्या दिगंत गर्दीत.

## वार्ता : २

मुंबई, दि० २७ : शहरात,
रस्त्यात
कितीतरी दिवसांपासून
दिसली नाही ती
घरी, दारी, लायब्ररीत.
कोणी म्हणतात, 'तिला अटक झाली.
फारच कडक बोलली हो ती
विचारस्वातंत्र्याच्या प्रश्नावर.'
कुणी म्हणतात, 'अशी एक अफवा आहे,
जीव दिला तिनं समुद्रात
त्यानं नकार दिला म्हणून,
जो असह्य झाला तिला,
त्याच्या नकाराचं स्वातंत्र्य मान्य असूनही.'
चौपाटीचं गदळ पाणी चरचरा फाटत होतं
जुन्या वृत्तपत्राच्या पिवळ्या पानांप्रमाणं
जिरवीत या दोन्ही बातम्या आपल्या पोटात.

# वादु तो मी—गोविंदु

## वादु तो मी—गोविंदु : १

पाण्याने स्वच्छ धुतलेले मांसखंड :
रक्तपेशीचे स्पंदन नाही, की
जिभाळीही नाही तिथे;
शिवाय कोंबडीच्या उच्चारामधला
अर्थ कधीच हरवला आहे
तिच्या पंखांच्या फडफडाटांसह.
त्याला साक्ष आहे आता फक्त सुरी :
जीवनवादी मरणाची धार, निःशब्द,
सांजेचा वाळला वातड तुकडा
काळा-शेंदरा.

## वादु तो मी—गोविंदु : २

स्टेनलेस ताटलीतले हे माशाचे मुंडके :
जबडा इवला, किंचित वासलेला,
चमचमत्या दातांची सुईची अग्रे,
त्यांवर एक वेंधळे हसू, ओले, मरणाचे
सुळकन तरंगताना खोल डोहात. तेव्हा
माणसे मरतात पाण्यात
श्वास कोंडून, गुदमरून,
पण ती श्वासोच्छ्वास करू शकतात
मरून, पाण्याबाहेर, मोकळया वाऱ्यात,
या सत्याची जाणीव नव्हती तिला
(हे महद्‌भाग्य त्या मासळीचे).
त्या मीनाक्षी टिकल्यांतून काचेच्या
शराब ठिबकत नाही,
आभाळही हिनकळत नाही पूर्वीसारखे
आपल्या अथांग निळेपणात;
त्यांत दिसते फक्त मरण
एका सौंदर्यवाद्याचे,
जो म्हणत असतो विजयानंदात :
'ऐसा प्रतिपादनामाजी वादु
तो मी म्हणे गोविंदु.'[1]

## मच्छीकमान : १

हैदराबादची ही मच्छीकमान.
मच्छी नाही इथे, नाहीत इषारेही
मादक मीनाक्षीचे,
चिलमनच्या हिरव्या-श्याम आडोशातले;
फक्त उभ्या आहेत देवड्या
जीर्ण, ओसाड, पड्ढ पड्ढ करणाऱ्या,
मोडक्या नवाबांच्या :
भिंतींना कुबट ऐतिहासिक गंध वटवाघुळांचा.
चारमिनारपाशी मात्र भिकारी ओरडत आहेत :
'जुम्मेरात, भरी मुराद—जुम्मेरात भरी मुराद.'

'फुर्र फुर्र' शिट्या किंचाळत नव्हत्या पूर्वीसारख्या
रस्त्याची एक बाजू लुळी पडली नव्हती आज[1]
निर्मनुष्य होऊन, अंगावरून वारे गेल्यासारखी;
शहर-कोतवालच्या आलीशान मोटारीमागून
धडधडत येत नव्हती जुनी फोर्ड निजामाची;
तरीही 'मक्का मशिदी'[2]च्या हौदाभोवती
'वज़ू'[3] करीत होते
मग़रिबच्या नमाज़ाकरिता, सवईने, फकीर—
अंगांत कफन्या, गळयांत माळा :
हिरव्या-पांढऱ्या माश्या
शिळया बिर्याणीवर घोंगावणाऱ्या !

## मच्छीकमान : २

मच्छीकमान उभीच होती
दिव्यांच्या लखलखाटात :
रिती, पोखरलेली,
बुबुळं झडलेल्या माशांच्या डोळयांसारखी
शुभ्र, हाडबंद. रात्र निर्मनुष्य.
तडाखेबंद खपत होती मिठाई
शाही हलवायांच्या दुकानांतली;

हारे भरभरून नेत होते उंचच उंच म्हातारे :
शुभ्र कफन्या फडफडत होत्या
बगळयांच्या पंखांप्रमाणे,
दाढ्या हालत होत्या
कबरेवरील चवऱ्यांसारख्या;
अन् दहा पावलांतच सारे हरवत होते—
ते हारे, ते म्हातारे
निस्तब्ध रात्रीच्या अंधारात.
'ते जिन[1] आहेत'
कुजबुजत होती पोरे हलवायांची;
हिरव्या माश्या गणगणत होत्या
रित्या बुऱ्यांवर;
दिवस फटफटत होता मुसेच्या काठावर.
मच्छीकमान उभीच, अवघडून, धुमी,
हरवलेली,
जीवन आणि मरण दोन्ही हरवून बसलेल्या
भुतांच्या जगात.
उघड्या नालीच्या काठाशी बडबडत होता
पिऊन पडलेला पोलीस शिंदीच्या धुंदीत :
'सची, जिन्नोंकाच शहर है यह—अयय्यो—
नी अम्मा,[2]
एक संन्यासी भी आ मिला है उसमे :
बडा जिन्न वो—सत्यागुरू.'[3]...
तेव्हा रस्ता जागा होत होता
'शंकरशेर'[4]च्या चहाच्या कपांतून
'खड्या'[5] चमच्यांच्या खणखणाटात.

## अमलताश : १

निळेभोर आकाश वर,
खाली अमलताश.
सोनेरी घोस फुलांचे, स्तनाकार
डहाळ्याडहाळ्यांवर :
निद्रिस्त हिरवेपणाला आलेली
तप्त सुवर्णी जाग, यौवनमंथर.
किती दिवसांपूर्वी लावले होते हे झाड ?
आज ते चैतन्याने बहरते आहे,
फुलांनी फुलते आहे,
सळसळते आहे वाऱ्यात
रंगगंधाची सतार होऊन,
झंकारते आहे निळाईचे बोल खुडून.
हे चलनवलन, हे जीवन
मीच दिले ना त्याला ?
'अहं वृक्षस्य रेरिवः ।"

## अमलताश : २

अमलताश :
हा सोनेरी विश्वास फुलांचा
पाकळीपाकळीने गळत आहे
माझ्या अहंकारासंगे.
अन् मातीचे चुंबन घेणाऱ्या फुलांत
कुजबुजत आहे अमलताश :
माणसा, जेव्हा तू हे झाड लावलेस
तेव्हा मीही उगवलो तुझ्यात
आपली हिरवी 'पाली' भाषा घेऊन.
(नाही तरी माणसांआधी झाडेच होती ना ?)
जेव्हा झाडे लावली जातात,
तेव्हा झाडाझाडांतून माणसेही
पेरली जातात.
त्या माणसांतून उगवतात पुन्हा झाडे,

ज्यांची मुळे जमिनीत नसतात,
छाया असतात आभाळावर. मात्र
आरण्यकाच्या सकाळधुक्यात
झाडे पठण करीत असतात, दूर,
'अहं मनुष्यस्य रेरिवः।'

## हे दुःखप्रिया : १

—हे दुःखप्रिया,
मी आहे सनातन दुःख.
जन्मलो तुझ्या, या जगाच्या प्रसववेदनेतून
पाठीला पाठ लावून.
नाही ओळखलंस मला ?
—ओळखलं.
तुला कसा विसरेन
माझ्या अनामिका ?
तुझाच वेध लागलाय.
पाहिल्यापासून तुला विंबलेला
माझ्या आसवांत :
पांचालीने नाकारलेल्या
कर्णाच्या मत्स्यवेधासारखा, अवेध्य !
—का, वाईट वाटतं
मत्स्यवेध झाला नाही म्हणून ?
काळंभोर काजळबिंब, अच्छेद्य,
जडलेलं असतं ना
फुलत्या-खिरत्या चंद्रकोरीला ?
दिसते का कधी तिची व्यथा
कालवलेली चांदण्यात ?

## हे दुःखप्रिया : २

—या चांदण्याचं काही सांगू नकोस.
ते असतं चोराच्याही मनात.
मी पाहिला आहे आज
सूर्य माझ्यात बुडताना.
माझ्यातच उगवेल तो उद्या
तुला माहीत आहे का
माझ्या अनामिका ?
—खरंच का रे दुःखप्रिया,
खरंच ?

## म्हणजे—म्हणजे : १

—कशाला आठवण करून देतेस
आता त्या क्षणांची ?
क्षण म्हणजे पक्षीच :
गेले उडून पंख फुटल्याबरोबर...
—आणि प्रेम म्हणजे तरी काय ?
एक दुःख !
—छे, दुःखही नव्हे.
अश्रू त्या दुःखाचे फक्त :
कसे पलकांत धरता येतील
एकदा सांडल्यावर ?
—सांडल्याचं काय !
अश्रूंची फुले
फुलांवर दव
दवावर ऊन
उनाचं काय !
आभाळाची साय
पुसून तर पहाय

## म्हणजे—म्हणजे : २

—थांब, पुसू नकोस ती आसवं :
पुसत्या पदरालाही
डाग लागत नाही त्यांचा.
—डाग पडतो काळजावर
कावळा कोकतो झाडावर !
—खरं नसतं तसं काहीच प्रेमाचं :
त्वचेइतकंच तात्पर्य त्याचं.
खरं फक्त रजोदर्शन !
—म्हणजे—म्हणजे ?
—म्हणजे जाऊन चंद्राला विचार;
चंद्रावरच्या कावळ्याला विचार
—तरी पण ?—म्हणजे ?
—वाघाचे पंजे !

...ओढून खर्रकन
खाली सोडला पदर तिनं, काचोळीही नव्हती अंगात :
उघडे भरदार स्तन, गोल गरगरीत, गोरे गोरे पान.
धडधड उरात, आसवं डोळ्यांत,
गालावरची लाज आली सांडून सरसरत खाली स्तनांपर्यंत;
अधिकच आरक्त दिसू लागली जांभळी कुचाग्रं
मुखाच्या विवर्ण चांदण्यात. 'ए, पाहा ना वर—'
ती म्हणाली हुंदके देत, 'घे, पाहून ठेव चांगले डोळे भरून
ही सूर्य-चंद्रांची अतिथी जोडी, अमोरसमोर,
दक्षिण सागरावर, कन्याकुमारीच्या काठावर; अन् सांग,
आहेत की नाही दोन सुडौल गोलार्ध पृथ्वीचे
स्थल-कालाचा संदर्भ हरवलेले?'
फाटली माझी दृष्टी विटक्या वस्त्रासारखी.
'जेव्हा मी नाचू लागते, हे हलू लागतात, थिरकू लागतात
थक्‌थय थक्‌थय—डळमळते भूमंडळ, नभमंडळ अवघे.
मीही होते बेभान पाहताना ह्या हालत्या, गरगरत्या वक्ररेषा—
काळाला येते भोवळ या सोनेरी रेषांची! घे पाहून,
उद्या दिसणार नाहीत, कधीच दिसणार नाहीत पुन्हा.
कापून टाकणार आहेत ना हे—ते उद्या—हो.
तूच शेवटचा पुरुष आहेस
हे पाहणारा. देवा, कोण पाहील माझं नृत्य त्यानंतर?
सांग उद्याला किती सुंदर होते ते. पाहा, स्पर्श करून पाहा,
चुंबून घे ही गोलाई—आ–ई–गऽ'
ऊन ऊन सोनेरी अश्रू सांडत होते स्तनांवरून सुवर्णमण्यांप्रमाणं.
आली तशीच गेली ती—आशा नर्तकी; बुडालं सूर्यबिंब बंद दारात.
अंधाऱ्या इस्पितळात पडलोय, काल कापलेल्या माझ्या पायासारखाच,
एकटा, अवाक् मी—मी नामा.[१]

## स्तन : २

हे स्तनच नसते तर ?
किंवा तेव्हाच कापून फेकून दिले असते तर ?
या वेदना तरी उरल्या नसत्या म्हणते मी—मी उर्वशी.
नाचते आहे आज इंद्रसभेत. माझे गोल उभट स्तन
हालताहेत, थरकताहेत तालावर—सुवर्णकलश अमृताचे !
बसलाय देववृंद भान हरवून थरथरत्या वक्ररेषांत;
त्यांना वाटतंय, काळच स्थिर झालाय इथं भोवऱ्याच्या घुमाऱ्यासारखा,
म्हणूनच आपण अमर आहो, या नृत्यक्षणापुरते—हूंऽ
या कुचभाराखाली ठणकणारी वेदना कळत नाही कुणालाच :
जन्म देताच परत आले मी सोडून बाळाला पृथ्वीवर.
म्हणे शापकाल संपला—तो तर आत्ता सुरू होतोय.
कळा लागल्यात स्तनाला अन् कौतुक होतंय कलेचं, नृत्याचं.
दूध जिरवून, वात्सल्य गोठवून नाचावं लागतंय—
काय करायचेत स्तन, स्तन्याचं सार्थक नसेल तर ?
कुणी ओढीत नाही दूध चुरुचुरू इवल्या कवळ्या ओठांनी,
निघताहेत दुधाच्या सिलका अंगभर. हे देव—
(ज्यांची सावली नि आसवं कधीच सांडत नाहीत भुईवर)
आईची आठवण विसरलेले : धुंद बसलेले मायावी राक्षस हे !
ही स्वर्गभूमी—मृत्यूचं भय नसलेली, फुलांची स्मितंही इथं गोठलेली, संगमर्मरी !
नको, नको, जावं पुन्हा शापित बनून मृत्युलोकात,
जिथं जन्म आहे, इवलंसं बाळ आहे, स्तनांत दूध आहे, अन्
पलीकडे उभं आहे मरण, फूल बनून, आईचे डोळे होऊन,
हसरे, न्हालेले अश्रूंनी, दुधांनी—

## पुत्र : १

—हो, तोच मी प्रख्यात कवी सुबोधचंद्र 'प्रशांत'.
असिधारा, प्रेममंडप, प्रीतिगंध—माझेच काव्यसंग्रह गाजलेले :
प्रीतीच्या इकारानं तर म्हणतात वेलांटी मारली सूर्यचंद्राला.
पुरस्कार मिळाला शारदापीठाचा; झालो पुढे कवीचा गॅझेटेड क्लास वन;
भोगला, राबवला अधिकार काश्मीरी शालीच्या सुखवस्तू शैलीत.
दरवळला 'सुगंधु सोनियाचा'—वृत्तपत्री शाईच्या उसन्या दर्पात.
आणि—
एके दिवशी आला दारात मागत भीक एक भिकारी
दिसणारा माझ्या परागंदा मुलासारखा, पुढे करून
भिक्षापात्र माझ्याच घरच्या चोरलेल्या भांड्याचं.
उडू लागली राख माझ्या आनंदाच्या, अहंकाराच्या पाकळ्यांत,
मानवतावादी काव्याच्या माझ्या उद्ध्वस्त शब्दांत,
स्वप्नाळू डोळ्यांत.
व्यासाच्याही डोळ्यांत उडाली असेल अशीच राख :
त्या राखेचं महाभारत केलं त्यानं !
माझ्या डोळ्यांत मात्र असहाय पाणी
त्याच्या पात्रात टाकताना पैसा, आसवाएवढा.

## पुत्र : २

'पुत्र म्हणजे नरकापासून वाचवणारा' की त्यातच पचवणारा ?'
काकाजी मार्तंड विचारीत होते प्रश्न, जखमेएवढे खोल आकाशाला.
काकाजी म्हणजे—ते—ते गेले होते बापूजींबरोबर दांडीयात्रेत; जागले मिठाला;
सत्तापदे नाकारून बसले जाऊन आश्रमात, जिथे पुढे विनोबा विकले सत्तेला :
बोलले, 'आणीबाणी म्हणजे अनुशासनपर्व'—गढूळले पाणी पवनेचे;
निघाले काकाजी धिक्कारून ग्रहणग्रस्त सर्वोदयाला; शिरले सत्याग्रहात
गोळ्यांच्या वर्षावात, भीरूंचे पाप धुण्यासाठी आपल्या पंचासारखे.
त्या वेळी गृहमंत्री असलेला त्यांचा पुत्र बाळासाहेब कलंडला होता मखमली खुर्चीत;
समोर रुजाम्यावर गळत होता भुसा पेंढाभरल्या वाघाच्या पोटातला;
मिटत्या नजरेच्या प्याल्यात, थरथरत्या सोनेरी फेसात, निळया निळ्या वेलीत
धूम्रवलयांच्या,
नाचत होती रात्रीची लवथवती गोरी गोरी अंगे शोधीत आपले पदर

गोळीबाराच्या हुकुमात मिसळलेले, फोनच्या आवाजात अडकलेले; मात्र
काही ऐकत नव्हते, पाहत नव्हते बाळासाहेब : एक चक्षुश्रवा!—
कात आलेला, फुंफाटणारा मखमालीच्या लवेत.
काकाजी कडाडून विचारीत होते,
कोसळताना धुळीच्या लोळात, अश्रुधुराच्या कल्लोळात,
'कोण येत आहे चालत खुर्चीच्या लाकडी पायांनी ?—कोण ?'
'मी—बाळा...' 'चूप. नाही. नसतं नातं किरणांचं मातीतल्या फुलांशी.
परंतु—कोण किरण ?—कोण माती ?—कुठली पानं ?—कुठल्या मुळ्या ?'
'काकाजी, खरंच, मुळ्याच कुजवतात लवलव हिरव्या पानांची—'
'हरामखोर : पानंच सडवतात मुळ्यांना—पालवीला अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या
मुळ्यांना.
खोटं बोलतोस बापाशी तू—सापाचा वंशज तू—सापच[२] आहेस तू :
विनतेची वंचना करणारा, पाताळअश्वाच्या शेपटीला चिकटणारा साप !
बाळा, बाळा, चल नीघ इथून—'
तरीही खुर्चीचे पाय पुढेच सरकत होते वाघाच्या पंज्यांनी.
दिसत होते काकाजींच्या विझल्या डोळ्यांना
फांद्यांत कापत होते आभाळाचे मौन, नियतीच्या शाईसारखे,
सारवलेले.

## कवीचे झाड : १

आळीमिळी घेऊन बसलेले
निळे निळे तळे, रत्नजडित,
मध्यभागी, गावाच्या बेंबीसारखे.[१]
पाण्याला टपोर खळी हास्याची,
लाजलालस सांजेची;
या साऱ्यांना पाठमोरे
लोक येणारे-जाणारे, आपल्यातच बुडालेले;
काठावर आंब्याचे झाड, हरवलेले
आपल्याच सावल्यांत;
त्याला आठवतो एक कवी
तिथे लिहीत बसलेला,
ही सृष्टी आपणच निर्मिली अशा मस्तीत.
म्हणतो,
'तों मज गमलें विभूति माझी[२]
स्फुरत पसरली विश्वामाजीं'
जळलेल्या मोहराला शब्द फुटतात :
'अरे कवन दिले मी तुला
ज्वलन ठेवून आपल्यापाशी.
ही सृष्टी सारी माझीच कविता
असंग्रहित, असंपादित.'
हिरवे हिरवे डोल
जळात खोल :
कवीच्या मनात राहिलेली ओळ.

## कवीचे झाड : २

मौन उभे तळ्याकाठी आजही
शंभर वर्षांचे ते झाड, पाहत
आपल्या पिवळ्या पाचोळ्याकडे.
डोंगराआड सूर्य
शब्दांमागील अर्थाप्रमाणे : मावळणारा, उगवणारा.
झाडाखाली एक मुलगा खेळतोय

खेळ भाकरीचा पाण्यावर, गात गात :
'गाठ मारुनी वैराला गोफण केली छान[3]
कठिण शब्द या धोंड्यांनीं करितों हाणाहाण.'
दिसत होता उद्याचा कवी त्या मुलग्यात
आपल्या आतड्यांची गोफण करणारा
हृदय फाडून...
... ... ... ...

दचकलो एकदम, खड्डा पडला माझ्या पोटात.
आतड्याच नव्हत्या तिथे गोफणीला
वैराची गाठ मारायला!
बांधावर माणसे मख्ख बसलेली,
काळानं शिटलेली; पसरत्या अंधारात
गोठलेले झाड :
आळीमिळी घेऊन बसलेले
मध्यभागी, गावाच्या बेंबीसारखे.

## खुल्दाबाद रोज़ा : १

करपल्या काळ्या पाषाणाची भिंत चिरेबंद :
कुढणे काळाचे, शतकांचे गोठलेले;
पायऱ्याही चोपड्या काळजाच्या,
त्याही काळ्याच, भेगाळलेल्या-निखळलेल्या,
कुठे कुठे तुटलेल्या दुव्यासारख्या; त्यावर
उभे दार कमानदार :
इतिहासाची जांभई कोरलेली दगडात;
आत कबर हिरव्या चादरीने झाकलेली;
चारी कोपऱ्याला चार 'मुतक्किये'[1] संगमर्मरी;
वर हिरवा चांदवा मखमली, भर्जरी;
दोन्ही बाजूला मोर्चेल; मागे उभा सज्जादा :
त्याचेही डोळे मोरपिसाचे, भूतकाळात रंगलेले,
रंगांधळे; मध्ये टपोर अंडी शहामृगाची :
शुभ्र, आरस्पानी, अपारदर्शी, दैवासारखी;
शहेनशाह औरंगजेब आलमगीर झोपलेला इथे
पांघरून आपल्या महत्त्वाकांक्षेची माती,
मक्केतल्याइतकीच पवित्र.
खुल्दाबाद रोज़ा :
किंचित् ठेंगणा दरवाजा
कंगाल खोपटांनी वेढलेला, चितकबऱ्या ढगात हरवलेला,
उदासीन, वाकलेला 'सिज़्द्यां'[2]साठी
आपल्या पराभवात.

## खुल्दाबाद रोज़ा : २

खुल्दाबाज रोज़ा—
खिन्न उघडा दरवाजा :
ऐतिहासिक म्यान एक रिती, पोकळ,
आपला खंजीर शोधणारी.
खाली पायऱ्यांवर फकिरांच्या पोरांची गर्दी :
मळके कुडते, फाटक्या सलवारी, विटक्या ओढण्या
(सर्वांवर पसरलेला उदास हिरवा रंग कर्बल्याचा[3])

कलकलत होत्या : धुळीत भांडणाऱ्या चिमण्या :
‘देना एक पैसा अल्लाके नामपर’.
त्यात उभी ती पोरगी, फाटक्यातून डोकावणारं तिचं गोरेपण
पिवळं, कळंजलेल्या सोन्याच्या पत्र्याचं.
डोळे गाईचे गोल, थीर, काळेशार, भोताली पांढरं वलय, खिन्न
चकचकीत कवड्यांचं, धारदार, चांदण्याला चरे पाडणारं.
‘हीच ती पोरगी’ कुजबुजला तो, ‘शंभुराव जहागिरदाराची पोर.
आपल्या मुलीचं कुवारपण सांभाळण्यासाठी आणून सोडली इथं,
वाढतेय फकिराघरी साबण्या खात भिकेच्या पैशानं.’
गणगणतात माश्या तिच्या हातातल्या चिकट तुकड्यांवर;
शेजारी उभे शंभुराव—लपवीत होते, ती शोधीत होती,
ओळख, नाते : एक विपरीत जननांतरसौहृद!
खुल्दाबाद रोज़ा :
ठेंगणा खिन्न दरवाजा,
ज्यावर पसरले होते एक पोरकेपण
अपहृत देवलदेवीच्या[२] विशाल नयनांपासून
ते या अश्राप डोळ्यांपर्यंत वाहत येणारे पोरकेपण, मृगनयनी, अपार,
शहामृगाच्या अंड्याइतकेच शुभ्र, खिन्न.
आरस्पानी, अपारदर्शी, सोसून शंभर पाठलाग,
पिऊन हजार वादळे वाळूची.

# परिशिष्ट

## लेखनाचे स्थल-काल आणि टिपा

१. रान–१ : मुंबई, ३०-८-६६
रान–२ : मुंबई, ३०-८-६६

२. पाणी–१ : मुंबई, ८-१०-६६
पाणी–२ : मुंबई, ८-१०-६६

३. वारा–१ : मुंबई-अलिबाग समुद्रप्रवास, २१-१-६७
वारा–२ : मुंबई, २४-१-६७

४. ऊन–१ : मुंबई, १९-८-६७
१. 'महो हुवा है गुहरमें इज़तेराब दर्याका'—ग़ालिब
ऊन–२ : मुंबई, १९-८-६७

५. तळे–१ : विलेपार्ले, मुंबई, ५-१०-६९
तळे–२ : विलेपार्ले, मुंबई, ५-१०-६९

६. चांदणे–१ : मुंबई, २५-१०-६९
चांदणे–२ : मुंबई, २५-१०-६९

७. कमळ–१ : मुंबई, २२-९-७०
कमळ–२ : मुंबई, २२-९-७०

८. अंधार–१ : मुंबई, १७-२-७१
अंधार–२ : मुंबई, १७-२-७१

१. तम आसीत् तमसा गूळ्हमग्रे-
ऽप्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ।
तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत्
तपसस्तन्महिनाजायतैकम् ॥
तिरश्चीनो विततो रश्मिरेषा-
मधः स्विदासीदुपरि स्विदासीत् ।
रेतोधा आसन् महिमान आसन्त्-
स्वधा अवस्तात् प्रयतिः परस्तात् ॥
—नासदीयसूक्त

९. तारा–१ : मुंबई, २९-११-७१
तारा–२ : मुंबई, २९-११-७१

१०. समुद्र–१ : मुंबई, ११-२-७२
समुद्र–२ : मुंबई, ११-२-७२

११. औरंगाबाद–१ : मुंबई, १५-२-७२
औरंगाबाद–२ : मुंबई, १५-२-७२

१. सुलतान मुबारक खिलजीने देवगिरीवर स्वारी करून यादव राजा हरपालदेव याचा पराभव केला. आणि त्याची कातडी सोलून दुर्गाच्या महाद्वारावर लटकविली. तेव्हापासून देवगिरी आणि त्याचा परिसर मराठवाडा सात शतके पारतंत्र्यातच राहिला.
२. सूर्याने उगवायचे नाकारले तेव्हा वसिष्ठ मुनींनी आपली छाटी काठीला अडकवून दिली आणि ती सूर्याचे काम करू लागली. ही छाटी म्हणजे सहिष्णू त्यागाचे, तेजाचे प्रतीक.
३. ता० १३ सप्टेंबर १९४८च्या सकाळी औरंगाबाद शहर भारतीय सेनेने निजामाच्या जोखडातून मुक्त केले. त्या दिवशी, सातशे वर्षांनंतर मराठवाडा खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला.

१२. दुपार–१ : मुंबई, २७-१२-७३
दुपार–२ : मुंबई, २७-१२-७३

१३. शब्द–१ : मुंबई, २७-१-७४
शब्द–२ : मुंबई, २७-१-७४

१४. अस्तित्व–१ : मुंबई, २७-२-७४
अस्तित्व–२ : मुंबई, २८-२-७४

१५. आरामखुर्ची–१ : मुंबई, १६-१०-७५
आरामखुर्ची–२ : मुंबई-औरंगाबाद प्रवास, २०-१०-७५

१. व्हॅन गॉफच्या एकाकी जीवनातील एक प्रसंग.
२. व्हॅन गॉफचे सूर्यफुलांचे प्रसिद्ध चित्र.

१६. रस्ते–१ : मुंबई, २९-१०-७५
रस्ते–२ : मुंबई, २९-१०-७५

१७. दाणे–१ : मुंबई, २७-१०-७६
दाणे–२ : मुंबई, २७-१०-७६

१८. वार्ता–१ : मुंबई, ३०-१०-७६
वार्ता–२ : मुंबई, ३०-१०-७६

१९. वादु तो मी—गोविंदु–१ : मुंबई १९-११-७६
वादु तो मी—गोविंदु–२ : मुंबई २०-११-७६

१. अगा बोलतियांच्या ठायीं । वादु तो मी पाही
जो सकलशास्त्रसंमतें कांही । सरेचिना
जो निर्वचूं जातां वाढे । आइकिलिया उत्प्रेक्षे सळु चढे
ज्यावरी बोलतियांचें गोडें । बोलणें होती
ऐसा प्रतिपादनामाजीं वादु । तो मी म्हणे गोविंदु
अक्षरांआंतु विशदु । अकारु तो मी

—ज्ञानेश्वरी, अध्याय १०

२०. मच्छीकमान–१ : हैदराबाद, २२-११-७६

१. पूर्वी निजामाची स्वारी निघाली म्हणजे माणसांची ये-जा एका बाजूने चालू ठेवून रहदारीचे नियंत्रण करण्यात येत असे.
२. हैदराबादची शाही मशीद. तिथला निजाम दर गुरुवारी–शुक्रवारी या मशिदीत नमाजासाठी जात असे. त्याच्या पूर्वजांच्या कबरीही या मशिदीत आहेत. त्यांचे दर्शनही घेण्याचा त्याचा रिवाज होता.
३. नमाजापूर्वी हातपाय धुण्याचा धार्मिक विधी.

मच्छीकमान–२ : हैदराबाद–मुंबई प्रवास, २३-११-७६

१. यक्ष-पिशाचे (मुस्लिम समजुतीप्रमाणे). हे जिन रात्री शाही हलवायांकडून मिठाई खरेदी करतात अशी एक दंतकथा हैदराबाद शहरात प्रचलित होती.
२. आयला (तेलगू शिवी).
३. सत्याग्रही.
४. त्या काळचे एक प्रसिद्ध हॉटेल.
५. कपात इतकी साखर टाकायची की त्यात चमचा रोवला तर तो खडा (उभा) राहिला पाहिजे.

२१. अमलताश–१ : मुंबई, ८-१२-७६

१. उपनिषद.

अमलताश–२ : मुंबई, ८-१२-७६

२२. हे दुःखप्रिया–१ : मुंबई, २१-१०-७७
हे दुःखप्रिया–२ : मुंबई, २१-१०-७७

२३. म्हणजे—म्हणजे–१ : मुंबई, ७-२-७८
म्हणजे—म्हणजे–२ : मुंबई, ७-२-७८

२४. स्तन–१ : मुंबई, ३०-४-७८

१. सोल्झेनित्सीन याच्या 'कॅन्सर वॉर्ड' या कादंबरीतील एका प्रसंगातील कल्पनेवर आधारित.

स्तन–२ : मुंबई, ३०-४-७८

२५. पुत्र–१ : मुंबई, १-५-७८
पुत्र–२ : मुंबई, १-५-७८

१. 'पुत्' नामक नरकापासून रक्षण करणारा तो पुत्र.
२. पाताळात बांधलेल्या घोड्याची शेपटी पांढरी की काळी यावर विनता आणि तिची सवत कद्रू यांच्यात वाद झाला. पैज लागली. जो हरेल त्याने दास्य पत्करावे अशी पैज ठरली. कद्रूने आपल्या पुत्रांना—सर्पांना—सूक्ष्म रूप धरून घोड्याच्या शेपटीला चिकटण्याचा गुप्त आदेश दिला. घोड्याची शेपटी काळी भासली आणि विनतेला कद्रूचे दास्य पतकरावे लागले. पुढे गरुडाने स्वर्गातून अमृतकुंभ आणून आपल्या आईची—विनतेची—त्या गुलामगिरीतून मुक्तता केली. सर्पांच्या त्या कपटाचा सूड घेतला.

२६. कवीचे झाड–१ : मुंबई, १२-६-७८

१. हे तळे सावंतवाडीचे. त्याच्या काठचे ते आंब्याचे झाड अजून उभे आहे. त्या झाडाखाली कविवर्य केशवसुत कविता लिहीत बसत होते अशी आख्यायिका गावातले लोक सांगतात.
२. सतार—केशवसुत.

कवीचे झाड–२ : मुंबई, १२-५-७६

३. गोफण—केशवसुत.

REFBK-0022811
REFBK-0022811

२७. खुल्दाबाद रोज़ा–१ : मुंबई, २५-१२-७८

१. चादर उडू नये म्हणून ठेवलेली संगमरवरी वजने.
२. नमाज पढताना गुडघे टेकून घातलेले लोटांगण.

खुल्दाबाद रोज़ा–२ : मुंबई, २७-१२-७८

१. अरबस्तानातील रणांगण, जेथील युद्धात हसन इमाम व त्यांचे कुटुंबीय यांनी बलिदान केले.
२. खुल्दाबादजवळच्या वेरूळच्या लेण्यातूनच अल्लाउद्दीन खिलजीच्या सैनिकांनी देवलदेवीचे अपहरण केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
२२८७
२४९०